सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, १० जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २८७ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## उच्च न्यायालयाच्या निर्णयाने उद्धव ठाकरेंना दणका, महायुतीला दिलासा

मुंबई : राज्यपाल नियुक्त आमदार प्रकरणी उद्धव ठाकरे समर्थक आणि पक्षाचे कोल्हापूर जिल्हाप्रमुख सुनील मोदी यांनी एक याचिका दाखल केली होती. ही याचिका अयोग्य असल्याचा निर्वाळा देत न्यायालयाने ती फेटाळली. हा उद्धव ठाकरेंच्या गटासाठी दणका आणि महायुतीसाठी दिलासा असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना सरकारने १२ जणांच्या नावांची यादी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना पाठवली होती. दरम्यान २०२२ मध्ये उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री या पदाचा राजीनामा दिला. नंतर बहुमताच्या जोरावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात महायुतीचे सरकार स्थापन केले.

# वाल्मिक कराडवर ईडीची कारवाई का नाही? : सुप्रिया सुळे

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी

मुंबई- दि. ९ जानेवारी : संतोष देशमुख हत्याप्रकरणाचा मास्टरमाईंड आरोपी वाल्मिक कराडला मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात ईडीने यापूर्वीच नोटीस दिली होती. मात्र, कुठलीही कारवाई न झाल्याने वाल्मिक कराड बिनधास्त असून वेळेवर ईडीने कारवाई केली असती तर सरपंच हत्याप्रकरण घडलंच नसते, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा खा. सुप्रिया सुळे यांनी गुरुवारी पत्रकारांशी बोलताना केली .

त्या म्हणाल्या की, गेल्या एक महिना बीड आणि परभणी घटनेबाबत आमचे लोक बोलत आहेत. आरोपींना फाशीची शिक्षा व्हायला हवी, अशी मागणी पहिल्यादा संसदेत बजरंग सोनवणे यांनी केली. संदीप क्षीरसागर , जितेंद्र आव्हाड यांनी अधिवेशनात हा विषय मांडला. मागील ३० दिवस ते बोलत आहेत. माणुसकीच्या नात्याने आपण सर्वजण एकच म्हणत आहोत की, पीडित देशमुख कुटुंबाला न्याय मिळायला हवा. मी अनेक वर्षे संसदेत काम करत आहे. पीएएमएले कायदा आला, यामधे खंडणी प्रकरणी कायद्यात तरतुदी आहेत. मला सरकारला प्रश्न विचारायचा आहे की, इडी हे केंद्रासाठी काम करत. वाल्मिक कराड यांच्या नावाने एक कागद आहे, पीएमएलए कायद्याअंतर्गत एक नोटीस यांना आली आहे, असे म्हणत सुळेंनी ती नोटीसच पत्रकार परिषदेत दाखवली. मात्र, अद्यापही त्या अंतर्गत कारवाई होत नसल्याचं त्यांनी सांगितलं.

पुढे बोलताना सुप्रियाताई सुळे म्हणाल्या की , वाल्मिक कराडची अटक खंडणी प्रकरणी झाली असून गुन्हा दाखल आहे. मग पीएमएलए कायदा का लागू केला नाही? ११ डिसेंबर एफआयआर आहे, त्यात वाल्मिक कराडच नाव आहे. आवादा कंपनीने हा गुन्हा दाखल केला आहे. त्यासंदर्भात ईडीकडून नोटीस आहे. मग, खंडणीची नोटीस असताना त्यांच्यावर कारवाई का नाही? एकीकडे तुम्ही नुसत्या आरोपांवर गुन्हा दाखल करता आणि इथ केस आहे, तिसरी एफआयआर दाखल केली आहे. मग वाल्मिक कराडवर ईडीची कारवाई का झाली नाही? जर आधीच वाल्मिक कराडवर कारवाई झाली असती, तर संतोष भाऊ यांची हत्याच झाली नसती असे सांगून त्या म्हणाल्या,'

लाडली बहीण योजना परळी तालुका अध्यक्ष वाल्मिक कराड आहे. ज्याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल आहे, त्याला तुम्ही लाडकी बहीण योजनेचा अध्यक्ष करता? अनिल देशमुख, संजय राऊत, नवाब मलिक याना एक कायदा आणि वाल्मिक कराडला वेगळा कायदा का? असा सवाल उपस्थित करुन त्या म्हणाल्या,'

अंजली दमानिया यांनी सुद्धा काही प्रश्न उपस्थित केले काही प्रश्नांची उत्तरे मिळाली. माझे काही प्रश्न आहे. पीएमएलएचा कायदा आणला तो काळा पैसा आणण्यासाठी होता. पीएमएमएल हा खंडणीसाठी सुद्धा लागू होतो असे दिसून येते. हे प्रकरण अर्थ खात्याच्या अंतर्गत येतो. वाल्मिक कराडच्या नावाने ईडीची नोटीस आहे. पीएमएलएचे अनेक केसेस झाल्या आहे. वाल्मिक कराडला पीएएमएलए आणि ईडीची कलमे का लावली नाही,

या प्रकरणात मी आणि खासदार बजरंग बाप्पा अर्थमंत्र्यांना ईडी कारवाईबाबतही पत्र लिहिणार आहोत. ही अशी खंडणी उकळली जात असेल तर कंपन्या गुंतवणूक कशी करणा ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

## प्लांटची चिमणी पडल्याने मोठी दुर्घटना, २५हून अधिक जण अडकले

रायपूर: छत्तीसगडच्या मुंगेलीमध्ये एक मोठी दुर्घटना घडली. एका प्लांटची चिमणी पडल्याने तिच्याखाली अनेक मजूर दबले गेले आहेत. घटनास्थळी बचावकार्य सुरू करण्यात आले आहे. या चिमणीखाली कमीत कमी २५ मजूर अडकल्याचे सांगितले जात आहे. तसेच यात काही मजुरांचा मृत्यू झाल्याचीही शक्यता आहे.

दुर्घटनेनंतर पोलीस आणि प्रशासनाच्या टीम्स घटनास्थळी पोहोचल्या. तसेच मलब्याखाली अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. ही घटना सरगाव ठाणे क्षेत्रातील रामबोड भागात घडली.




# जीएसटीच्या जाचातून छोटे व्यापारी व सर्वसामान्य करदात्यांची सुटका करा: सचिन पायलट

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. ९ जानेवारी :भारतीय जनता पक्षाच्या सरकारच्या कर दशहतवादाचा सामना लघु, छोटे, मध्यम व्यापारी यांना करावा लागत आहे. जीएसटी स्लॅबची रचना अत्यंत किचकट असल्याने व्यापाऱ्यांना प्रचंड त्रास होत आहे. तसेच नोकरदार, मध्यमवर्ग व सर्वसामान्य जनतेकडून सर्वात जास्त जीएसटी कर संकलन होत असून मुठभर श्रीमंतांवर कर सवलतींचा वर्षाव होत आहे, हे चित्र बदलण्यासाठी केंद्र सरकारने येत्या अर्थसंकल्पात जीएसटीमध्ये बदल करत जीएसटी २.० आणावा, अशी मागणी माजी केंद्रीय मंत्री व अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस सचिन पायलट यांनी गुरुवारी येथे केली.

गांधी भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना ते म्हणाले की, १ फेब्रुवारी २०२५ रोजी भाजपा सरकार केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणार आहे. या अर्थसंकल्पात जनतेच्या हिताकडे लक्ष देऊन जीएसटी दहशत निर्माण करणाऱ्या कर रचनेत बदल केला पाहिजे. २०२१-२२ या वर्षात एकूण जीएसटीपैकी जवळपास दोन तृतीयांश किंवा ६४% लोकसंख्येच्या तळातील ५०% लोकांकडून आले तर फक्त ३% ऋद्ध वरच्या १०% मधून आला. हा गरिबांवरचा कर आहे जो सतत वाढत जातो. आरोग्य विमा सारख्या अत्यावश्यक सेवांवर जीएसटी दर हा लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी १८% आहे. पॉपकॉर्नवर सुद्धा तीन प्रकारचा



जीएसटी लावला जात आहे.

मोदी सरकार दरवर्षी रेकॉर्डब्रेक कलेक्शनचा दावा करते पण जेव्हा श्रीमंतांचा विचार केला जातो, तेव्हा २०१९ मध्ये कॉर्पोरेट करात २ लाख कोटी रुपयांची कपात केली. पंतप्रधान मोदी अरबपतींसाठी मोठी कर कपात देतात आणि गरीब आणि मध्यमवर्गांवर मात्र करांचा भार टाकतात. असा आरोप करुन ते म्हणाले,'जीएसटीची विक्रमी वसुली होत असून देशातील सर्वात जास्त जीएसटी मध्यमवर्ग व सर्वसामान्य जनतेकडून जमा होतो.

जीएसटीचा प्रस्ताव सर्वात प्रथम डॉ. मनमोहनसिंग यांनी आणला होता, त्याला भाजपा व आत्ताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोध केला होता. आधार कार्ड, डीबीटी, किरकोळ क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणूक या सर्वांना विरोध केला होता पण सत्तेत येताच काँग्रेसच्याच या योजना भाजपाने राबवल्या. जीएसटी लागू करण्यासाठी मध्यरात्री १२ वाजता मोठा गाजावाजा करून काहीतरी विक्रमी करत असल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला. गुंतवणूकीला काँग्रेसचा विरोध नाही पण ती मनमानी पद्धतीने केली जाऊ नये अशी काँग्रेसची भूमिका आहे. भाजपा सरकार अर्थव्यवस्था मजबूत असल्याचे चित्र निर्माण करत आहे पण वास्तविकता वेगळी आहे. जीडीपीमध्ये मोठी घसरण होत आहे. भारताला १० टक्के जीडीपीचे लक्ष्य ठेवून वाटचाल करावी लागेल पण भाजपा सरकार कोणतेच खरे आकडे जाहीर करत नाही. भाजपा सरकारमध्ये पारदर्शकतेचा अभाव आहे. सरकारला योग्य वाटतील तेच आकडे जाहीर केले जात आहेत. उलट काँग्रेस सरकार असताना जी वस्तुस्थिती आहे ती मांडली जात होती. दरडोई उत्पन्नाकडेही लक्ष देण्याची गरज आहे. रोजगार निर्मिती होत नाही देशात प्रचंड बेरोजगारी वाढलेली आहे, तसेच महागाईसुद्धा वाढलेली आहे, असेही पायलट यांनी सांगितले..

इंडिया आघाडी मजबूत पण..

दिल्लीत आप आप व काँग्रेस स्वतंत्रपणे लढत असल्याबद्दल पायलट म्हणाले की, लोकशाही, संविधान व देश हित लक्षात घेऊन काँग्रेससह अनेक पक्षांनी एकत्र येऊन इंडिया आघाडीची स्थापना केली आहे, ही आघाडी आजही मजबूत आहे. प्रत्येक राज्यातील परिस्थिती वेगळी असते त्यानुसार काही निर्णय घ्यावे लागतात याचा अर्थ इंडिया आघाडी कमजोर झाली, असे म्हणता येणार नाही असेही पायलट यांनी स्पष्ट केले.

या पत्रकार परिषदेला प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष नसीम खान, आमदार अमिन पटेल, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते भरतसिंह, झिशान सय्यद आदी उपस्थित होते.

# पाप झाकण्यासाठी ओबीसीचा आसरा

## मनोज पा.जरांगे यांची मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर टीका

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०९ :- मास्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ आम्ही करत असलेल्या आंदोलनामुळे मंत्री धनंजय मुंडे यांनी आरोपी वाल्मिकी कराड टोळीच्या साहाय्याने केलेले पाप उघडे पडत असून ते झाकण्यासाठी मुंडे ओबीसीचा आसरा घेत आहेत. षडीयंत्र करून मंत्री मुंडे हेच राज्यात प्रतीमोर्चे काढायला लावत असल्याची टिका मराठा संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे यांनी केली.मराठा आरक्षण प्रश्नी २५ जानेवारीचे उपोषण झाल्यानंतर आपण मंत्री धनंजय मुंडे यांचा जोरदार समाचार घेऊ असेही जरांगे म्हणाले.



छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित सरपंच संतोष देशमुख आणि परभणीचे सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यूच्या निषेधार्थ पैठणला महा जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकात या मोर्चाच्या सांगता झाली यावेळी मराठा संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे बोलत होते. यावेळी आमदार सुरेश अण्णा धस, मयत सरपंच देशमुख यांची कन्या वैभवी संतोष देशमुख,तसेच देशमुख कुटुंबीय ,दीपकभाई केदार युवा सरपंच शिवराज भुमरे, चेअरमन सी.ए सचिन भैय्या घायाळ, माजी मंत्री पटेल, काजी करिमोतुल्ला,विकास पाथ्रीकर, चिमुकली हर्षा किशोर सदावर्ते यांनी आपले विचार व्यक्त केले मंचावर मा.नगराध्यक्ष सुरज लोळगे, तालुकाध्यक्ष लक्ष्मण औटे,रमेश पाटील,तालुकाध्यक्ष विनोद तांबे आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना आमदार सुरेश धस यांनी सरपंच देशमुख यांच्या शवविच्छेदनाच्या आठपाणी अहवालाची माहिती देत आरोपी कराड याचा मंत्री धनंजय मुंडे हे आका असल्याचे सांगत त्यांच्या टोळीच्या नावावरील संपत्ती, दाखल गुन्हे तसेच परळी पोलीस ठाण्यात केलेले गैरप्रकार समोर आणत पोलिसांवर जोरदार टीका करत राज्यात आता टीव्ही कलाकार पोलीस टीमची नियुक्ती करावी असे धस म्हणाले. देशमुख आणि सूर्यवंशी यांच्या हत्येच्या निषेधार्थ सुरू असलेले आंदोलन भटकवण्यासाठी राज्यात रिचार्ज पुढारी आणले जात असल्याचे ही आमदार धस यावेळी म्हणाले तर आमच्यावर कितीही गुन्हे दाखल करा आम्ही न्याय मिळे पर्यंत थांबणार नसल्याचे जरांगे पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले. कावसनकर स्टेडियम ते छत्रपती शिवाजी महाराज चौक अश्या या जनआक्रोश महामोर्चाला हजारोंच्या संख्येने आंदोलक सहभागी होते.यावेळी राष्ट्रगीताने या जनआक्रोष मोर्चाची सांगता करण्यात आली.

# 'मिशन अयोध्या' चित्रपटाचा ट्रेलर लाँच



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी - अयोध्येतील राम मंदिराचे उद्घाटन आणि मंदिरात प्रभू श्रीरामाच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेला वर्षपूर्ती होण्याच्या पार्श्वभूमीवर प्रभू श्रीरामांची महिमा सांगणारा व विचार मांडणारा 'मिशन अयोध्या' हा चित्रपट २४ जानेवारी रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे. भारताचा इतिहास, संस्कृती आणि आध्यात्मिकतेचा अभूतपूर्व संगम असणारा आर के योगिनी फिल्म्स प्रॉडक्शन निर्मित आणि समीर सुर्वे दिग्दर्शित 'मिशन अयोध्या' चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा महंत रामगिरी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवार, ७ जानेवारी रोजी छत्रपती संभाजीनगर येथे पार पडला.

मंगळवारी (दि.७) सायंकाळी शहरातील प्रोझोन मॉलमध्ये मिशन अयोध्या या मराठी चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्चिंग च्या प्रसंगी बोलत होते. भविष्यामध्ये यासाठीही संघर्ष करावा लागेल, असेही महाराज म्हणाले. यावेळी व्यसपिठावर आमदार अनुराधा चव्हाण, चित्रपटाचे निर्माते, कृष्णा शिंदे, योगीता शिंदे, दिग्दर्शक समीर सुर्वे आदींची उपस्थिती होती.

या चित्रपटाचे निर्माते म्हणून जबाबदारी कृष्णा शिंदे आणि योगिता शिंदे यांनी सांभाळली आहे. तर कथा कृष्णा शिंदे यांची असून पटकथा आणि संवाद लेखन समीर सुर्वे यांनी केले आहे. या चित्रपटातील सर्व कलाकार आणि तंत्रज्ञांनी ट्रेलर लाँच सोहळ्याला हजेरी लावली होती. तसेच रामगिरी महाराज यांच्या अनुयायांनीही बहुसंख्येने गर्दी केली होती. ज्ञानोबा - तुकाराम माऊलींचा गजर करीत टाळ मृदुंगाच्या तालावर वारकऱ्यांनी हजेरी लावली होती. यावेळी उपस्थितांनी 'जय श्री राम' नामाचाही जयघोष केला. तसेच यानिमित्ताने छत्रपती संभाजीनगर शहरातील मुख्य रस्त्यांवर आणि चौकात चित्रपटाची फलकबाजी करण्यात आली होती.



सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अंजना नदीवरील पुलाचे भूमिपूजन संपन्न



सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.९, तालुक्यातील धानोरा,येथे पूर्णा व भुरडी नदीवर तसेच वांगी बु. येथील गाव नाला तर उपळी व मंडगाव येथील अंजना नदीवर प्रधानमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत मंजूर १२ कोटी ५५ लाख ८१ हजार रुपयांच्या एकूण ५ पुलांच्या बांधकामाचे भूमिपूजन खा. डॉ. कल्याणराव काळे यांच्याहस्ते तर माजीमंत्री आ. अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षस्थानी पार पडला.

विकास कामांच्या भूमिपूजन निमित्ताने खा. कल्याणराव काळे व आ. अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत भराडी येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आ. अब्दुल सत्तार यांनी अध्यक्षीय भाषणात तालुक्यातील विविध विकास कामांची माहिती दिली. प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत मतदारसंघात रस्त्यांचा विकास होत असून आज उद्घाटन झालेल्या पुलांच्या कामामुळे धानोरा, पळशी, सिसारखेडा, उपळी, भराडी, वांगी, मोढा यासारख्या गावांना १२ महिने जोडण्याचे काम होणार आहे. खा. कल्याणराव काळे यांच्या पुढाकाराने या गावातील अनेक दिवसांचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागणार असल्याचे आ. अब्दुल सत्तार म्हणाले.

तालुक्यातील अंभई, नानेगाव, जंजाळा, आमठाणा, कोटनांद्रा, बोरगावबाजार ते बोरगाव सारवणी ते खातखेडा, रा.म.मा. ते सारोळा रस्ता आणि सिल्लोड ते दहेगाव या नवीन ५० कोटींच्या रस्त्यांना मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता मिळाली असल्याची माहिती आ. अब्दुल सत्तार यांनी दिली.

पक्षभेद बाजूला ठेवून सिल्लोडच्या विकास कामांसाठी कायम सोबत राहणार असल्याचे प्रतिपादन यावेळी खा. डॉ. कल्याणराव काळे यांनी मनोगत व्यक्त करतांना केले. केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी केव्हाही मला हाक द्या मी हजर राहील अशी ग्वाही खा. काळे यांनी दिली.

पुढे बोलत असतांना खा. काळे म्हणाले की, आ. अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात सर्वाधिक विकास कामे सिल्लोड मतदारसंघात झाली. ते सर्वांना सोबत घेऊन चालतात. त्यांची लोकप्रियता फार मोठी आहे. म्हणूनच छत्रपती संभाजीनगर येथील सांस्कृतिक मंडळाचे मैदान स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्यानंतर आ. अब्दुल सत्तार यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यास भरले. आ. अब्दुल सत्तार यांचे राजकारणा पलीकडे संबंध आहे. आम्ही दोघांनी ते टिकवले, ते संबंध आजही जिवंत आहे.

यावेळी खा. डॉ. कल्याणराव काळे यांनी त्यांच्या खास शैलीत उपस्थितांना खळखळून हसविले. निवडणूक येतात जातात, यात कमी जास्त मते मिळतात. पराभव स्वीकारून मी स्वतः १० वर्ष घरी होतो. पण काही लोकांना निवडणुकीचा प्रभाव जास्तच जिव्हारी लागला, मला आणि आ. अब्दुल सत्तार यांना सोबत पाहून भोकरदनच्या भुया उंचावतात असा टोला खा. काळे यांनी रावसाहेब दानवे यांना नाव न घेता लगावला.

याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती केशवराव पा. तायडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष श्रीराम पा. महाजन, युवानेते माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर , काँग्रेस तालुकाध्यक्ष भास्कर घायवट, खरेदी विक्री संघाचे चेअरमन रमेश साळवे, माजी जि.प. सदस्य कौतिकराव मोरे, कृउबा समितीचे संचालक दामूअण्णा गव्हाणे, नंदकिशोर सहारे, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे, विठ्ठल सपकाळ, सयाजी वाघ , सुधाकर पाटील, प्रशांत क्षीरसागर ,प्रवीण मीरकर , राजू गौर, शेख सलीम हुसेन , निजाम पठाण, यांच्यासह भराडी सरपंच पप्पू जगनाडे ,उपसरपंच गजानन महाजन ,तालुका जिनिंग प्रेसिंग चेअरमन गणेश गरुड, व्हाईस चेअरमन अनिस पठाण, आरेफ रब्बानी, कोंडीबा राकडे , दिनकर गोरे ,पोलीस पाटील शेरु जमादार, सोमीनाथ गोरे, बाबुराव महाराज बिडवे, आसेफ पठाण, राहुल महाजन, अर्जुन शेळके, मयूर अग्रवाल, सदाशिव खोमणे, विशाल महाजन, सय्यद मोइनोद्दीन यांच्यासह बाबासाहेब देशमुख, सिकंदर खान पठाण, जब्बार पटेल ,शेख रब्बानी, अजय राकडे, अंभईचे सरपंच रामदास दुतोंडे ,पिरोळा सरपंच रवी काळे ,युवा सेनेचे शिवा टोम्पे ,गणेश ढोरमारे, जगन्नाथ कुदळ, डॉ.दिनेश साळवे, गजानन वाघ, रवींद्र काकडे ,विलास वाघ, भाऊलाल दुधे ,आनंदा दुधे, सोमीनाथ काकडे, प्रभाकर सुरडकर ,प्रमोद शिंदे ,डॉक्टर अनिल साळवे, नामदेव पांढरे, संभाजी हावळे ,विनायक पांढरे, चांदापूर सरपंच रमेश ठाकूर, सलीम पटेल ,समाधान जंजाळ, समाधान साळवे, मोढा सरपंच लक्ष्मण कल्याणकर, आदींसह पंचक्रोशीतील लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा

अलक (८)

### सीमोल्लंघन




दसऱ्याचा दिवस होता. सीमोल्लंघनाची मिरवणूक, नंतर रावण वध म्हणजे लोकांची गर्दी स्वदेशीचा प्रचार करण्यास योग्य संधी आहे. असा विचार करून केशव व त्याचे दोन मित्र भगोरे व डबीर यांनी वंदे मातरम हे गीत गायले व त्यानंतर केशवने खरे रावण मारणे म्हणजे काय यावर अत्यंत जहाल असे भाषण केले. नेहमीप्रमाणे दसऱ्याच्या दिवशी मिरवणुकीने गावाबाहेर जाऊन रावणाचा फटाके उडवून वध करणे; या लोकांच्या बोथट वृत्तींना आज केशवने खरेच सीमोल्लंघन घडवले होते. पण केशवची ही देशभक्ती लक्षात आल्यावर सरकारी गुप्तचरांचा ससेमिरा चालू राहिला तो कायमचाच. वंदेमातरम् चा उद्-घोष करणाऱ्यांना दंडही ठोठावत असत. (क्रमशः)

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## प्रतिबंधात्मक आदेश जारी

छत्रपती संभाजीनगर - आगामी कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९७१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी जारी केले आहेत. दि.१९ जानेवारी २०२५ पर्यंत हे आदेश लागू असतील. या आदेशान्वये सार्वजनिक ठिकाणी शस्त्र वापरण्यास, दाहक स्फोटक पदार्थ बाळगण्यास, प्रक्षोभक भाषणे, असभ्य वर्तन करण्यास, प्रतिमा, आकृत्या इ. चे प्रदर्शन करण्यास इ. कृत्य करण्यास तसेच पाच किंवा पाचापेक्षा अधिक व्यक्तिंना विनापरवानगी एकत्र येणास बंदी घालण्यात आली आहे. या आदेशातून कर्तव्यावर असलेले पोलीस अधिकारी व अन्य सक्षम अधिकारी यांना वगळण्यात आल्याचेही आदेशात नमूद आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

## बंजारा ब्रिगेड सोयगाव तालुका अध्यक्षपदी- अरविंद राठोड यांची निवड



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.९ जानेवारी : तालुक्यातील जरंडी येथील युवा कार्यकर्ता अरविंद बिरबल राठोड यांची बुधवार (दि.८) बंजारा ब्रिगेडच्या तालुकाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली.बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड,प्रदेश अध्यक्ष राहुल राठोड,जिल्हा अध्यक्ष संतोष राठोड यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन अरविंद राठोड यांना तालुकाप्रमुख पदाची जबाबदारी मिळाल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

## एसबीआय म्युच्युअल फंडकडून गुंतवणूकदार शिक्षण उपक्रम

छत्रपती संभाजीनगर : प्रत्येक मोठी कामगिरी एका लहान पावलापासून सुरू होते. आपण चालायला शिकण्यापूर्वी उभे राहायला शिकतो आणि मग पहिले पाऊल टाकतो. त्याचप्रमाणे संपत्ती निर्माण करण्यासाठी लहान सुरूवात करणे, सातत्यपूर्ण गुंतवणूक आणि शिस्तबद्ध राहण्याची गरज असते. पारंपरिक गुंतवणुकीचे पर्याय एकेकाळी मान्यताप्राप्त होते. परंतु आजच्या आर्थिक वातावरणात अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्यांच्यापैकी एक म्हणजे प्रामुख्याने सिस्टेमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन्स (एसआयपी)च्या माध्यमातून म्युच्युअल फंड होय, जे संपत्ती निर्मितीचे शक्तिशाली आणि सहजसाध्य माध्यम आहे.

## रुग्ण अखेर स्वतःच्या पायांवर उभा - डॉ. आशिष अरबट

अहमदनगर - कोरोनावर मात केलेल्या काही रुग्णांमध्ये एव्हॅस्कुलर नेक्रोसिसची समस्या दिसून येते. पुण्यातील सुप्रसिध्द रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट सर्जन, डॉ. आशिष अरबट (ऑयस्टर अँड पर्ल हॉस्पिटल्स येथे ४३ वर्षीय लाला धुमाळ यांच्यावर सुपरपाथ किंवा सुप्राकॅप्सुलर पर्क्यूटेनिअसली असिस्टेड टोटल हिप रिप्लेसमेंट हे अत्याधुनिक तंत्र हिप रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेस फायदेशीर ठरत आहे.

## जिंदाल वर्ल्डवाइड लिमिटेडकडून ४:१ बोनस शेअर जाहीर

मुंबई - तीन दशके उत्कृष्टता आणि विश्वासाची परंपरा जोपासणाऱ्या टेक्सटाइल क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी जिंदाल वर्ल्डवाइड लिमिटेडने आपल्या शेअरधारकांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आज झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत, कंपनीने ४:१ या प्रमाणात बोनस इक्विटी शेअर वाटपास मंजुरी दिली असून, कंपनीच्या प्रगतीतीसाठी हा महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

## अक्युरे ने रॅडिक्सॅक्टप्रणाली आणि व्हायटलहोल्ड तंत्रज्ञानाचा वापर

पुणे-,अक्युरे मेडिकल इक्विपमेंट इंडिया प्रा. लि. ने आज पुणे येथील सह्याद्री हॉस्पिटल टीमद्वारे रॅडिक्सॅक्टएँ प्रणाली आणि व्हायटलहोल्ड' तंत्रज्ञानाचा वापर करून डीप इनस्पिरेशन ब्रीथ होल्ड उपचारांचा प्रारंभिक क्लिनिकल अनुभव जाहीर केला. या टीमने या तंत्रज्ञानासह जगातील पहिला रुग्ण उपचार केला, ज्याने रेडिओथेरपी क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला, आणि त्यानंतर १५ रुग्णांचे उपचार केले, ज्यात १३ डाव्या बाजूच्या स्तन कॅन्सर असलेल्या रुग्णांचा समावेश आहे.

## आयडीएफसी सीबीडीटीच्या प्रत्यक्ष कर संकलन प्रणालीवर लाइव्ह

मुंबई - आयडीएफसी फर्स्ट बँकेने भारत सरकारच्या केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाच्या (सीबीडीटी) वतीने प्रत्यक्ष कर गोळा करण्यासाठी प्राप्तिकर पोर्टलसह त्याचे एकत्रीकरण जाहीर केले. डाउनलोड करण्यायोग्य चालान, सुलभ पेमेंट आणि त्वरित पेमेंट कन्फर्मेशनसह बँकेचे ग्राहक आता प्रत्यक्ष कर भरण्यासाठी त्रासमुक्त पेमेंट अनुभव घेऊ शकतात. बँक ग्राहक आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या वापरकर्त्यासाठी अनुकूल रिटेल आणि कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग प्लॅटफॉर्म वापरू शकतात किंवा रोख, धनादेश किंवा डिमांड ड्राफ्ट वापरून आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या कोणत्याही शाखेत कर भरू शकतात.

## 'जमाई नं. १' मधील तिच्या व्यक्तिरेखेसाठी फिट होण्याबद्दल

झी टीव्हीवरील मालिका 'जमाई नं. १' आपल्या प्रीमियरपासून सर्व योग्य कारणांमुळे चर्चेत आहे. प्रेक्षकांच्या हृदयात स्थान निर्माण करणाऱ्या अभिषेक मलिक आणि सिमरन कौर यांना नील आणि रिद्धी या नावानेही ओळखले जाऊ लागले आहे. अलीकडील भागामध्ये, रिद्धी नानीला दिलेले वचन कसे पाळते आणि नीलला तिच्या ऑफिसमध्ये नोकरीची ऑफर देते हे दर्शकांनी पाहिले.


## कलाकारांनी सांगितले त्यांचे आवडते 'हिंदी' शब्द!

विश्व हिंदी दिवस निमित्त एण्ड टीव्ही कलाकार भारताच्या सांस्कृतिक ओळखीचा महत्त्वपूर्ण भाग असलेल्या हिंदी भाषेचे जतन व संवर्धन करण्याचे महत्त्व सांगण्यासोबत त्यांचे आवडते हिंदी शब्द आणि त्या शब्दांशी संलग्न असण्यामागील कारणे सांगत आहेत. हे कलाकार आहेत रवी महाशब्दे (मालिका 'अटल'मधील क्रिष्णन बिहारी वाजपेयी), स्मिता साबळे (मालिका 'भीमा'मधील धनिया), हिमानी शिवपुरी (मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील कटोरी अम्मा) आणि रोहिताश्व गौड (मालिका 'भाबीजी घर पर है'मधील मनमोहन तिवारी).

## घडा घडा बोलायचं' चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस

छत्रपती संभाजीनगर - मराठी सिनेसृष्टीतील प्रत्येक कलाकार हा स्पष्ट वक्ता आहे आणि म्हणूनच जे आपल्या मनात असतं तेच आपल्या ओठांवर असतं. अस म्हणत भूषण प्रधान आपला आगामी सिनेमा घेऊन येत आहे ज्यांच नाव आहे 'घडा घडा बोलायचं'. या सिनेमाचं नाव येवढं भारी आहे की, या चित्रपटाची गाणी आणि डायलॉगसमध्ये किती वजन असेल यांचा नक्की विचार करायला प्रेक्षकांना भाग पाडणार हा चित्रपट आहे . 'घडा घडा बोलायचं' या चित्रपटाचे दिग्दर्शक नितीन रोकडे असून या चित्रपटात भूषण प्रधान, सिमरन नेरुरकर आणि आरोह वेलणकर मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. 'पटाखा' फिल्म्स प्रस्तुत 'घडा घडा बोलायचं' हा चित्रपट एक संगीतमय रोमँटिक चित्रपट असणार आहे. 'माजा माँ' या सिनेमात माधुरी दिक्षितच्या तरुणपणीची भूमिका साकारणारी सिमरन नेरुरकर या सिनेमातून मराठी सिनेविश्वात पदार्पण करत आहे. आरोह वेलणकरला त्याच्या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या फनरल, चंदू चॅम्पियन, धर्मवीर या चित्रपटातून प्रेक्षकांच्या मनात आपल्या अभिनयाचा ठसा उमवटवल्यानंतर आता एका वेगळ्याच रूपात प्रेक्षकांच्या भेटिस येणार आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते नगरपरिषदस्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे पारितोषिक वितरण



अहिल्यानगर दि.९- नगरविकास विभागांतर्गत जिल्हा नगरपरिषदस्तरीय वार्षिक क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धेचे पारितोषिक वितरण मंगळवारी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या हस्ते करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा सहआयुक्त प्रशांत खांडकेकर आदी उपस्थित होते.

स्पर्धांच्या माध्यमातून कामाचा ताण कमी होऊन नवी ऊर्जा अधिकारी - कर्मचाऱ्यांना मिळते, तसेच त्यांच्यात सांघिक भावना निर्माण होते. त्यामुळे अशा स्पर्धांचे नियमितपणे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा जिल्हाधिकारी सालीमठ यांनी व्यक्त केली. स्पर्धा नियोजनाबद्दल श्री.खांडकेकर यांचे कौतुक करून स्पर्धा आयोजनासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली.

श्री.येरेकर म्हणाले, खेळामुळे मानवी जीवनातील ताण - तणाव कमी होण्यास मदत होते. कामाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात ताण असतो. त्यातून खेळासाठी वेळ काढल्यास जीवनातील आनंद घेता येतो. या क्रीडा स्पर्धांपुरता आपला खेळ मर्यादित न ठेवता यापुढे आपण सातत्याने दररोज काही वेळ स्वतःसाठी काढून आपले कौशल्य आणि छंदाची जोपासना करावी, असे आवाहन त्यांनी केले. मान्यवरांच्या हस्ते ३२ क्रीडा प्रकार आणि ९ सांस्कृतिक कार्यक्रमातील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. स्पर्धेत सहभागी सर्व नगरपरिषदांना सहभागाबद्दल प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. राहुरी नगरपरिषदेने सर्वाधिक पारितोषिके पटकावले. त्या खालोखाल श्रीरामपूर आणि देवळाली नगरपरिषदेने यश संपादन केले.

राज्याच्या क्रीडा धोरणास अनुसरून नगरविकास विभागाच्या अंतर्गत जिल्हा नगरपरिषदस्तरीय वार्षिक क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २७ ते २९ डिसेंबर २०२४ कालावधीत राहुरी कृषी विद्यापीठात करण्यात आले होते. स्पर्धेत जिल्ह्यातील १५ नगरपरिषदा व नगरपंचायती तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील नगर विकास शाखेत कार्यरत अधिकारी - कर्मचारी अशा एकूण ९७० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. ३९ क्रीडा व सांस्कृतिक प्रकारात स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेसाठी विविध समित्यांची व उप समित्यांची स्थापना करण्यात आली होती. नियोजन समिती सदस्य सचिव म्हणून देवळाली प्रवरानगर परिषदेचे मुख्याधिकारी विकास नवाळे यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाला जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदा आणि नगरपंचायतींचे मुख्याधिकारी आणि अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपायुक्त, सहायक आयुक्त, स्पर्धक खेळाडू आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

## उद्योगाशी निगडीत समस्या किंवा तक्रारी कळविण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन


अहिल्यानगर दि.८ - जिल्ह्यातील उद्योजकांच्या समस्या आणि तक्रारी सोडवून औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी पुढाकार घेतला असून उद्योजकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होत असल्यास जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तक्रार करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक एकत्रितपणे औद्योगिक क्षेत्रांना भेटी देणार असून उद्योग संघटनांच्या प्रतिनिधींशी संवाद साधणार आहेत.

उद्योजकांना उद्योगस्नेही वातावरणात उद्योगाचा विकास करता यावा यासाठी त्यांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. औद्योगिक क्षेत्रात उद्योजकांना कोणाकडूनही आणि कसल्याही प्रकारचा त्रास होत असल्यास त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ०२४१२३४५००१ या क्रमांकावर कळवावे. जिल्हाधिकाऱ्यांना प्रत्यक्षात भेटूनही तक्रार देता येईल किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पत्त्यावर पत्राद्वारेदेखील कळविता येईल. कारवाई करतांना सबंधित उद्योजक किंवा इतर व्यक्तीचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार आहे.

जिल्ह्यात रोजगार निर्मितीसाठी औद्योगिक विकास महत्त्वाचा असून जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीत मोठे उद्योग यावेत यासाठी शासन आणि प्रशासन प्रयत्नशील आहे. उद्योगांसाठी आवश्यक सुविधांची निर्मिती करून उद्योगांना जिल्ह्याकडे आकर्षित करण्यात यशही येत आहे. जिल्ह्यात नव्या औद्योगिक वसाहती उभ्या करण्याचे प्रयत्न शासनामार्फत सुरू आहेत. अशा परिस्थितीत उद्योजकांना त्यांच्या उद्योगाच्या विकासासाठी आवश्यक वातावरण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यात अडथळा आणणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यात येईल, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

उद्योजकांनी तक्रारी व्यतिरिक्त इतरही समस्या असल्यास त्या जिल्हा उद्योग केंद्र किंवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे कळवाव्यात. उद्योगांच्या समस्या दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील, असेही श्री.सालीमठ यांनी स्पष्ट केले आहे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी उद्योजकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात, असे निर्देशही त्यांनी दिले आहेत.

## दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ९ जानेवारी भारताची पहिली महिला मुख्याध्यापिका क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती दुर्गा इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज बिडकिन मध्ये साजरी करण्यात आली.यावेळी शाळेतील महिला शिक्षिकांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी सावित्रीमाई व महात्मा फुले यांच्या वेशभूषेत भाषण सादर केले. शिक्षकांनी सावित्रीमाईचे महिलांसाठी किती मोठे योगदान आहे हे विद्यार्थ्यांना सांगितले. सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांना आतातरी भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा असे प्राचार्य अभिजित इंगळे सर यांनी भाषणात नमुद केले.यावेळी शाळेचे संस्थापक ओमप्रकाश जैस्वाल, सचिव रोशन जैस्वाल, राजेंद्र जैस्वाल,शाळेचे प्राचार्य अभिजीत इंगळे सर, दर्शना कोकणे, सुनिता चव्हाण, दिक्षा साबळे ,ओसीन शिंदे, जयश्री नजन , आरती इंगळे, राणी हटकर , शिवानी ठाकूर, सीमा वंजारे या सर्व शिक्षकांची उपस्थिती होती.

## बिडकीन येथील सृजन विद्यालयाचे सभागृहाचे उद्घाटन राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते संपन्न




तभा वृत्तसेवा

बिडकीन दि .९ जानेवारी पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सृजन शैक्षणिक प्रतिष्ठान संचलित सृजन माध्यमिक विद्यालयाच्या सभागृहाचे राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते दि ६ जानेवारी रोजी

करण्यात आले आहे, या कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षस्थानी न्यायमूर्ती अंबादासराव जोशी होते,फॉटाना उघोग समूहाच्या अर्थसाहाय्यातून ही इमारत बांधकाम करण्यात आले आहे, उद्घाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ हिरु गुरसहणी, सचिव नितीन कंधाकर, कोषाध्यक्ष भास्कर आवीकर, महेश बावस्कर,मंजूषा दुसाने,फॉटना उघोग समूहाचे शमिक बोर , रमेश चावल, पूजा पिंच आदींची प्रमुख उपस्थितीसह शालेय समिती अध्यक्ष नरसिंह कुलकर्णी, डॉ अंतराम धरपळे, बद्रीनाथ नरवडे, राजेंद्र कुलकर्णी, सरपंच अशोक धर्मे,उघोजक शिवराम त्रिवेदी, सतीश यादव,माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण,किसन तोतला, आदींसह शाळेचे मुख्यध्यापक ठाणगे,सर्व शिक्षक कर्मचारी यांची उपस्थिती होती, सूत्रसंचालन स्नेहल कुलकर्णी,व आभार राजेंद्र कुलकर्णी यांनी केले.


## सोयगाव शहरातील कै.बाबुरावजी काळे मराठी स्कुल येथे आनंद मेळावा संपन्न



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.९ जानेवारी : कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूल सोयगाव येथे आनंद मेळावा उत्साहात साजरा झाला या आनंद मेळाव्याचे उद्घाटन ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेश यादव,शिवज्योती शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्था प्रतिनिधी प्रा.कमलेश काळे,ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ.दादासाहेब पवार,शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस,उपमुख्याध्यापक सागर घाटे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले.या मेळाव्यात प्राचार्य डॉ.राजेश यादव यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की,कमवा व शिका व्यवहाराचे ज्ञान व्हावे तसेच नफा तोटा,विविध वस्तुंची ओळख,गर्दीतली धाडस,बोलण्याची पद्धत,वजनाचे प्रमाण,पैशाची ओळख, पैशांचा हिशोब,धाडस व्हावे असे सांगितले एकुण ७० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन घरुन वडापाव, इडली डोसा,भेळ,पाणी पुरी,खमंग,भजे,मठ्ठा,विविध प्रकारचे खाद्यपदार्थ तयार करून विकले या आनंद मेळाव्यात पालक,महाविद्यालयाचे प्राचार्य,प्राध्यापक,शालेय विद्यार्थी शाळेचे शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी या मेळाव्याचा आनंद घेतला,या मेळाव्याचे सुत्रसंचलन आशा पंडित यांनी केले तर आभार शितल गावंडे यांनी मानले.

## राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार प्राप्त यांचा सोयगाव पोलीस स्टेशनचे सपोनि पंकज बारवाल यांच्या हस्ते सत्कार




तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.९ जानेवारी

राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार प्राप्त व्यक्तींचा सोयगाव पोलीस स्टेशन तर्फे सत्कार संपन्न दर्पण कर बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था संघ नाशिक यांच्यावतीने सोयगाव येथील सहा व्यक्तींना राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार-२०२५ मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये पाच ५ जानेवारी २०२५ रोजी राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार अनुक्रमे सोयगाव येथील समाज प्रबोधनकार विष्णू मापारी सोयगावकर,कृषीभूषण अरुण सोहनी,आरोग्य दूध दिगंबर वाघ,समाजसेवक व सामाजिक कार्यकर्त्या दत्तू रोकडे, समाजसेवक संजय बोरसे,या सर्वांना या सर्वांना राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार मिळाल्याबद्दल सोयगाव नाट्यपंढरी मध्ये सोयगाव पोलीस स्टेशनच्या वतीने सर्वांचा सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल,उपनिरीक्षक गजानन आरेकर यांच्या हस्ते सर्वांचा सत्कार करण्यात आला.यावेळी यावेळी पोलीस कर्मचारी रवींद्र तायडे,सादिक तडवी,गजानन दांडगे सह योगेश बोखारे उपस्थित होते.

## बन्सीधर पिराजी सोकटकर यांचे निधन

तभा वृत्तसेवा




बिडकीन दि ९ जानेवारी : बिडकीन येथील रहिवासी बन्सीधर पिराजी सोकटकर वय ८५ वर्ष यांचे दि.८ बुधवार सकाळी सहा वाजता वृद्धपकाळाने निधन झाले त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी सहा वाजता बाजार गल्ली बिडकीन येथील लाडवाणी समाज स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांचे पश्चात दोन मुले,दोन मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे. सहाय्यक फौजदार अशोक सोकटकर व एनसीसी ऑफिसर बाबासाहेब सोकटकर यांचे वडिल होत.

गयाबाई पाटील यांचे निधन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.९ जानेवारी



तालुक्यातील जरंडी येथील गयाबाई रामदास पाटील (वय९०)यांचे बुधवार रोजी पहाटे ४ वा.निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर दुपारी ३ वा.अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात मुलगा,५ मुली,सुना, नातवंडे असा परिवार आहे.ते कृष्णा पाटील यांच्या त्या आई होत.

## अग्रलेख...

# केजरीवालांचा पराभव अटळ

दिल्ली विधानसभेच्या निवडणुका आणि मतमोजणीनंतर नव्या सरकारची स्थापना कधी होणार याची घोषणा करून, केंद्रीय निवडणूक आयोगाने आधीच तापलेल्या दिल्लीच्या वातावरणातीत उष्मा अधिक वाढवला आहे. जाहीर केल्याप्रमाणे ७० सदस्यीय दिल्ली विधानसभेसाठी ५ फेब्रुवारीला मतदान आणि ८ तारखेला मतमोजणी होणार आहे. पण दिल्लीमध्ये महिनाभरापूर्वीच निवडणुकीचा माहोल तयार झालेला आहे. दिल्लीच्या राजकारणावरील अरविंद केजरीवाल यांचे गेल्या १० वर्षांचे एकछत्री साम्राज्य उलथवून टाकण्यासाठी यंदा भारतीय जनता पार्टी सर्व शक्तिनिशी मैदानात उतरली आहे. नाही म्हणायला काँग्रेस पक्षदेखील रिंगणात आहे. पण हा पक्ष दिल्लीत विधानसभेसाठी उमेदवार उभे करून, आम आदमी पक्षाविरोधात लढतो की निवडून येण्याची खात्री असलेल्या भाजपाची मते खातो, हे बघावे लागणार आहे. गेली १० वर्षे आम आदमी पार्टीच्या अनेक मंत्र्यांनी केलेल्या भ्रष्टाचारामुळे दिल्लीची जनता बेजार झाली आहे. यातील काही मंत्री अजूनही कारागृहात असून, काही जणांची बेलवर सुटका झालेली आहे. दस्तुरखुद्द अरविंद केजरीवाल यांना भ्रष्टाचारामुळे कारागृहाची हवा खावी लागली. सध्या ते बेलवर असले तरी केंद्र सरकारवर विविध यंत्रणांच्या दुरुपयोगाचे आरोप करताना त्यांची जीभ थकताना दिसत नाही. अण्णा हजारे यांच्या आंदोलनातून जन्म झालेल्या आम आदमी पक्षाने जसे अल्पावधीत यश मिळविले, त्याच गतीने या पक्षाची लोकप्रियताही वेगाने घसरली. पक्ष स्थापनेच्या वेळी राजकारणात प्रवेश करणार नाही, राजकारणात आलो तर श्रीमंती थाटात वावरणार नाही, मोठ्या बंगल्यात राहणार नाही, आलिशान चारचाकीने फिरणार नाही, भ्रष्टाचाराचे नामोनिशाण मिटवून टाकीन, अशा केलेल्या केजरीवालांच्या वल्गना केव्हा हवेत विरून गेल्या हे जनतेलाही कळले नाही. मुख्यमंत्री होताच त्यांच्या राहणीमानात फरक पडला. त्यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्यांवर एकापाठोपाठ एक आरोप होऊ लागले, शिशमहल या त्यांच्या कोट्यवधी खर्चून बांधलेल्या फाईव्ह स्टार बंगल्याचे प्रकरण पुढे आले. त्यांनी बंगल्याच्या लॅट्रिन, बाथरूमपासून दिवाणखान्याच्या सजावटीवर केलेला खर्च डोळे दीपवून गेला, त्यांच्या कार्यकाळात झालेला दारू घोटाळा गाजला, जाहिरातींवर त्यांच्या सरकारने केलेल्या खर्चाने तोंडात बोटं घालायला भाग पाडले. दिल्लीची अव्यवस्था करण्यात त्यांच्या सरकारने कुठलीही कसर सोडली नाही. राजधानीतील रस्त्यांची दुर्दशा त्यांच्याच कार्यकाळात अनुभवायला आली. गुन्हेगारीत झालेली वाढ, परालीचे प्रकरण आम आदमी पक्षाच्या सरकारच्या काळातच पुढे आले. सत्तेवर असताना रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा विक्रम केजरीवाल यांच्या नावे नोंदविला गेला. दिल्लीतील वाहतुकीचा उडालेला बोजवारा कुणामुळे, हा प्रश्न विचारल्यास एकच उत्तर पुढे येते. ज्या अपेक्षा केजरीवाल सरकारबाबत व्यक्त झाल्या, त्या पूर्ण करण्यात ते अपयशी ठरले. केंद्रीय मंत्र्यांवर आणि प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांवर निराधार, बिनबुडाचे आरोप करण्यात या सरकारने कुठलीच कसर सोडली नाही. आरोप करताना जशा त्यांच्या पक्षाच्या नेत्यांची जीभ सैल झाली तसेच त्या आरोपांवरून गोत्यात सापडल्यानंतर अथवा कोर्टात खेचल्या गेल्यानंतर माफी मागण्याचे वैषम्य या पक्षाच्या कर्त्याधर्त्यांना कधी वाटले नाही. आता तर सत्तेत येण्याची हॅट्ट्रिक साधण्याचा या पक्षाचा प्रयत्न सुरू आहे. पण त्यांना दिल्लीतील जनता या आपदेला किती साथ देते हे पाहावे लागणार आहे.

दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी ५ फेब्रुवारीला १ कोटी ५५ लाख मतदार मतदानाचा हक्क बजावतील. यापैकी ५८ जागा खुल्या प्रवर्गातल्या असून, १२ जागा अनुसूचित जातींसाठी राखीव आहेत. मतदारांमध्ये ८३.४९ लाख पुरुष, तर ७१.७४ लाख महिलांचा समावेश आहे. २५ लाख ८९ हजार तरुण मतदार असून, त्यातील २.०८ लाख नवमतदार आहेत. दिल्लीत २०१५ आणि २०२० च्या निवडणुकीत आम आदमी पक्षाने बाजी मारली होती. या दोन निवडणुकांमध्ये आम आदमी पक्षाने अनुक्रमे ६७ आणि ६२ जागांवर विजय मिळविला होता. तेव्हा भाजपाला केवळ अनुक्रमे ३ आणि ८ जागांवर समाधान मानावे लागले होते आणि काँग्रेस पक्षाचा भोपळाही फुटला नव्हता. काँग्रेसची कामगिरी गेल्या काही निवडणुकांपासून निराशाजनकच राहिली आहे. यंदाही या पक्षाच्या यशाबाबत जनता साशंक आहे. या पक्षाने प्यारी दीदीला दरमहा २१०० रुपये देण्याचे आश्वासन जाहीरनाम्यात दिले असले तरी आजच्या परिस्थितीत त्यांच्याकडे या आश्वानपूर्तीची जबाबदारी येणारच नाही, हे येरागबाळादेखील सांगू शकेल. गेली २५ वर्षे भारतीय जनता पक्ष दिल्लीच्या सत्तेपासून दूर आहे. अरविंद केजरीवाल यांच्यापूर्वी दिल्लीत काँग्रेसचे सरकार होते. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत कोणत्याही परिस्थितीत सत्तेत येण्याचे भाजपाचे प्रयत्न आहेत. त्यांच्या या प्रयत्नात संघ परिवाराच्या ताकदीचा लाभ त्यांना मिळू शकेल. संघ परिवारातर्फे मतदारांकडे शतप्रतिशत मतदानाचा आग्रह धरताना, 'एक है तो सेफ है' तसेच 'बटेंगे तो कटेंगे' याची जाणीवही करून दिली जाणार आहे. हरयाणा आणि महाराष्ट्राच्या निवडणुकीत हा फॉर्म्युला काम करून गेला, हे देशाने अनुभवले आहे. ही बाब जशी भाजपासाठी फायद्याची ठरणार आहे, तिथेच त्यामुळे विरोधकांमध्ये चिंता उत्पन्न झाली आहे. संघाच्या या रणनीतीला उत्तर कसे द्यायचे, याची योजना अजून तरी आम आदमी पक्षाने आखल्याचे दिसत नाही. मुस्लिमांच्या मतांवर या पक्षाचा डोळा राहणार असला तरी यावेळी हिंदू मतदारांनाही भुरळ पाडण्याची तयारी या पक्षाने चालविली आहे. पुजाऱ्यांना महिन्याकाठी १८ हजारांची रेवडी देण्याची घोषणा, हा त्याच धोरणाचा भाग आहे. गेल्या निवडणुकीत पाणी, वीज बिल माफ करण्याच्या केलेल्या घोषणांनी हा पक्ष तरला. पण यंदा तीच बाब या पक्षाला विजयापर्यंत घेऊन जाईल, असे कुणीही म्हणण्यास कचरत आहे. उलटपक्षी केजरीवाल यांचा पराभव अटळ आहे, अशी परिस्थिती दिसत आहे.

भाजपाचा विजयरथ हरयाणापासून निघालेला आहे. त्याने महाराष्ट्र आणि हरयाणा काबीज केला आहे. केवळ घोषणाबाजी न करता या पक्षाने मतदारांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्याचा शब्द पाळला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विकासाचा झंझावात जसा या राज्यातील मतदारांना भावला तसाच तो दिल्लीकरांनाही भावणार, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. येथील मतदार जसे देशाच्या सुरक्षिततेबाबत चिंतित आहेत, तसेच केंद्र सरकारच्या विभिन्न योजना त्यांच्यापर्यंत पोहोचत नसल्याबद्दलही त्यांची नाराजी आहे. आयुष्यमान भारत योजनेंतर्गत गरिबी रेषेखालील रुग्णांना ५ लाखांपर्यंतच्या मिळणाऱ्या उपचारांपासून दिल्लीकरांना वंचित राहावे लागत आहे. लोकांच्या सुरक्षेचे प्रश्न ऐरणीवर आहेत. दिल्लीतील एमसीडी ताब्यात येऊनदेखील दिल्लीकरांपुढील समस्यांचा पाढा कमी होण्याचे नाव नाही. नायब राज्यपाल आणि केंद्र सरकार यांच्याशी भांडण्यात केजरीवाल सरकारचा किती वेळ वाया गेला, याची मोजदादच नाही. तेवढा वेळ विकासाला दिला असता तर आज दिल्लीकर कुठल्या कुठे पोहोचले असते, हे सांगावे लागू नये. चांगले रस्ते, यमुनेची स्वच्छता आणि २४ तास शुद्ध पाण्याची केलेली घोषणा आम्ही पूर्ण करू शकलो नाही, हे केजरीवालांनीच मान्य केले आहे. दारूचे ठेके, विद्यार्थ्यांसाठी शाळा बांधकाम, गरिबांचा उपचार खर्च आणि सरकारी भरतीत घोटाळे झालेले आहेत. दिल्लीत इंडिया आघाडीत फूट पडली आहे. काँग्रेस नेते अजय माकन यांनी तर केजरीवाल यांचे कोणतेच धोरण नसून, ते राष्ट्रद्रोही असल्याचा आरोप केला आहे. दुसरीकडे आम आदमी पार्टीने काँग्रेस नेत्यांवर निवडणुकीसाठी भाजपाकडून पैसा घेतल्याचा आरोप केला आहे. लोकसभेतील सख्खे शेजारी आज एकमेकांपुढे उभे ठाकले असताना, भाजपाचे आव्हान कसे स्वीकारतात, हे बघावे लागणार आहे. दिल्लीतील समस्यांकडे बघता, आम आदमी पार्टीची राजवट दिल्लीकरांसाठी 'आप'दाच ठरलेली आहे. भ्रष्टाचारात गुरफटलेली ही आपदा कशी दूर करायची याची योजना आखली जात असताना शिशमहल बांधणारे, दिल्लीकरांपुढे प्यारी दीदीचे जाळे टाकणारे पुढारी हवेत की गरिबांना मोफत घरे देणारा पक्ष हवा, हे मतदारांना ठरवायचे आहे.

---

## इतस्ततः

डॉ. विवेक राजे

# गुणात्मक वाढ म्हणजेच पंच परिवर्तन

जगातील सगळ्यात मोठी संघटना म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ येणाऱ्या विजयादशमीला १०० वर्षे पूर्ण करणार आहे. काही अपवादात्मक व्यावसायिक संघटना सोडल्यास १०० वर्षे एका ध्येयाने प्रेरित होऊन सातत्याने कार्यरत असणारी सामाजिक सांस्कृतिक संस्था आज तरी जगात दुसरी नाही. १९२५ मध्ये विजयादशमीला पहिले पाच स्वयंसेवक बरोबर घेऊन डॉ. हेडगेवारांनी रुजवलेल्या या संघटनेचे आता एका प्रचंड मोठ्या वृक्षामध्ये रूपांतर झालेले दिसते आहे. या १०० वर्षांच्या काळात संघावर अनेक आघात झाले. ते सगळे आघात-आरोप झेलत संघ आपल्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करीत राहिला. हिंदू समाजाचे संघटन करताना संघाने काळानुरूप बदल स्वीकारले. १०० वर्षे पूर्ण करणाऱ्या या हिंदूंच्या संघटनेने शताब्दी वर्षानिमित्त पंच परिवर्तनाची हाक दिलेली आहे.

समाजात कार्य करताना कोणतीही संघटना वा व्यक्ती त्याच समाजाच्या संपर्कातून प्रभावित होत असते. त्याच वेळी ते संघटन वा व्यक्ती समाजाला प्रभावित करीतच असते. सद्य:काळात हिंदू समाजाला जर कोणत्या एका विचाराने सर्वाधिक प्रभावित केले असेल तर तो निःसंशयपणे संघ विचार होय. तसेच आज हिंदू समाजाला सर्वाधिक प्रभावित करणारे संघटन म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघच होय, हे संघाचे टीकाकारही मान्य करतील. समाज संघटनाचे कार्य हे निरंतर चालणारे कार्य आहे, याची संघाला प्रथमपासूनच चांगली जाणीव आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत सामाजिक विघटनाला कारणीभूत ठरणारे विविध आयाम लक्षात घेत संघाने पंच परिवर्तनाची हाक दिलेली आहे. स्वदेशी, कुटुंब प्रबोधन, नागरी कर्तव्यांचे पालन, सामाजिक समरसता आणि पर्यावरण संरक्षण हे ते पाच आयाम आहेत. जगात विविध प्रदेशांत तेथील हवामान, वातावरण, वैचारिक स्वातंत्र्य आणि प्रगल्भता, जीवनाप्रति सर्वसामान्य लोकांना असणारी आस्था आणि स्थापित व्यवस्थेनुसार विविध संस्कृती आकाराला आल्या. या देशात एक सर्वसमावेशक, उदार, सहिष्णू आणि निसर्गाभिमुख जीवनदायी अशी संस्कृती अस्तित्वात आली. काळानुसार त्यात काही बदल झाले; मूळ तत्त्व मात्र कायम राहिले. त्यातच युरोप आणि मध्यपूर्वेतून झालेले आक्रमण हे धार्मिक, सांस्कृतिक तसेच आर्थिक आक्रमणदेखील होते. त्याचा परिणाम म्हणजे येथील लोकांच्या जीवनविषयक श्रद्धांची प्रचंड मोठ्या प्रमाणावर मोडतोड होण्यात झाली. येथील संस्कृतीने निर्माण केलेली निसर्गाभिमुख, उदार जीवनदृष्टी उद्ध्वस्त होण्याचा धोका निर्माण झाला. आज जेव्हा विविध कारणांनी जग अधिकाधिक जवळ येते आहे तेव्हा हा धोका सर्वोच्च पातळीवर पोहोचलेला दिसतो. त्यामुळे आज समाजातील प्रत्येक व्यक्तीला 'स्व'चे भान असणे आवश्यक झाले आहे. 'स्व'चे भान याचा अर्थ या मातीत तयार झालेले विचार, जीवनदृष्टी, संसाधनांचा सदुपयोग, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, विचारशीलता, माणूस म्हणून व्यवहार समजणे आणि व्यक्ती तथा समाजाने तसे जीवन अंगीकारणे होय.

पंच परिवर्तनातील दुसरा मुद्दा हा कुटुंब प्रबोधनाचा होय. व्यक्ती-व्यक्ती मिळून समाज तयार होतो. समाज एकसंध राहण्यासाठी आवश्यक असलेली सामाजिक संस्था म्हणजे कुटुंब व्यवस्था होय. कोणत्याही समाजाला एकत्र ठेवण्यात कुटुंब व्यवस्था मोठे योगदान देते. पण आज या कुटुंब व्यवस्थेलाच सुरुंग लागलेला दिसतो आहे. तीन पिढ्यांनी एकत्र राहणे एवढा मर्यादित विचार कुटुंब व्यवस्थेत असत नाही तर संस्कार संक्रमित करणारी किंवा संस्कारांची सुदृढ जोपासना करणारी व्यवस्था म्हणजे कुटुंब होय. सदस्यामध्ये संवाद हे कुटुंबात अभिप्रेत असलेले वैशिष्ट्य होय. दुर्दैवाने आज एकमेकांबरोबर वेळ घालवणे, संवाद साधणे, एकमेकांना समजून घेणे तसेच सदस्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आवश्यक तेवढे स्वातंत्र्य देणे, परस्परांविषयी आदर, हे कुटुंबातून घडताना दिसत नाही. स्वकेंद्रित विचार आणि कृती घडताना दिसत आहेत. कुटुंब व्यवस्थेचे अधःपतन होताना दिसत आहे. सुदृढ समाज सुदृढ कुटुंबातूनच आकाराला येत असतो. सशक्त जीवनविषयक दृष्टिकोन आणि जीवनशैली सशक्त व सुदृढ कुटुंब व्यवस्थेतूनच आकाराला येऊ शकते. म्हणून कुटुंब प्रबोधन आजच्या काळात अत्यावश्यक आहे.

पंच परिवर्तनातील तिसरा मुद्दा नागरी कर्तव्यांचे पालन हे आहे. नागरी कर्तव्यांचे पालन म्हणजे, राष्ट्र म्हणून जे काही नियम असतील त्या नियमांचे पालन करणे होय. आम्हाला नागरिक म्हणून काही निहित कर्तव्य आहेत. जसे रहदारीचे सर्वसामान्य नियम आहेत. ज्यामध्ये मार्गाच्या डाव्या बाजूचा वापर किंवा चौकावरील सिग्नल पाळणे, महामार्गांवर दिलेले गतिनिर्बंध यासारख्या नियमांचा समावेश होतो. या सगळ्या नियमांचे पालन करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य होय. लोकशाहीमध्ये मतदान करणे हे सर्व नागरिकांचे निहित कर्तव्य आहे. आज या देशात लोकशाही आहे हे अभिमानाने सांगणारे अनेक लोक मतदान करण्याचे कर्तव्य टाळताना दिसतात. ही नागरी कर्तव्याची पायमल्लीच ठरते. आपले विहित कर न भरता उत्पन्नाचे स्रोत लपवणे हेदेखील नागरिक कर्तव्याला चुकतात हेच दाखविते. कर्तव्यपालनामुळे दोन नागरिकांमध्ये किमान सामंजस्य निर्माण होते. राष्ट्राला कोणत्याही प्रकारे हानी पोहोचेल अशी कोणतीही कृती न करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्यच होय. आज अधिकारांबाबत जागृत असलेला आमचा समाज कर्तव्यांकडे दुर्लक्ष करताना दिसतो.

पंच परिवर्तनातील चौथा स्तंभ म्हणजे सामाजिक समरसता. सामाजिक समरसतेचा संघाला अभिप्रेत असलेला अर्थ हा की, कोणत्याही व्यक्तीने आपल्या वर्गाबाहेरील किंवा समूहाबाहेरील व्यक्तींप्रति आत्मीयतेने व प्रेमाने व्यवहार करणे होय. प्रदेश, भाषा, रंग, खानपान, पोशाख तसेच जाती, उपासना पद्धती यामध्ये विविधता असणे हे नैसर्गिक आहे. हे मान्य करून त्या पलीकडे जात या वेगळेपणाचा सन्मान करीत सौहार्दपूर्ण व्यवहार म्हणजे सामाजिक समरसता. सर्व समाजघटकांच्या मनात एकमेकांबद्दल एक विश्वास, आदर आणि प्रेम निर्माण करण्यासाठी हे आवश्यक आहे. सद्य:स्थितीत या विविधतेचा वापर करून या देशाला, विखंडित करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. समरसता साधण्यात समाज अपयशी ठरला तर भविष्यातही हा धोका निर्माण होणार हे नक्की. त्यामुळेच या देशाला व हिंदू समाजाला सशक्त करण्यासाठी सामाजिक समरसतेच्या भावनेला दृढमूल केले पाहिजे. पंच परिवर्तनाची पाचवी पायरी म्हणजे पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी समाजात जागृती निर्माण करणे. या पृथ्वीवर मानवी अस्तित्व हे निसर्गाचाच घटक आहे. मानवी जीवन या संपूर्ण चराचर सृष्टीचा अविभाज्य भाग आहे. निसर्गाने मानवाला भरभरून वरदान दिले आहे. परंतु अनियंत्रित भोगवादामुळे आम्ही निसर्गाचे आणि पर्यायाने मानवजातीचे अपरिमित नुकसान करीत आहोत. निसर्गाचे संवर्धन करण्याऐवजी आम्ही त्याची भरून न येऊ शकणारी हानी करीत आहोत. जागृत विचार आणि आचार समाजात निर्माण करून देण्याचा हा प्रयत्न असणार आहे. रासायनिक खते, जंतुनाशके आणि प्लॅस्टिकच्या वापराला निक्षून नकार देणे गरजेचे आहे. पण यासाठी निश्चय आणि धारिष्ट्य समाजात निर्माण होणे आवश्यक आहे. पर्यावरण संरक्षण हे भारतीय जीवन पद्धतीचा महत्त्वपूर्ण घटक होता. तो विचार आणि कृती याला समाजात पुन्हा महत्त्वपूर्ण स्थान मिळण्यासाठी या दिशेने समाजात कृतिशीलता बाणवणे हेच या पाचव्या स्तंभाचे उद्दिष्ट आहे.

समाज संघटन करीत असतानाच समाजात गुणात्मक वाढही व्हायला हवी. आज संघ विचारांना जागतिक पातळीवर सर्व समाज घटकांमध्ये मान्यता मिळालेली दिसते आहे. संस्कृती संवर्धन आणि हिंदू समाज संघटन करतानाच समाजात गुणात्मक वाढ होण्यासाठी प्रयत्न म्हणजेच पंच परिवर्तन होय.

९८८१२४२२२४

---

## वेध

विजय कुळकर्णी

# बुलढाणा जिल्ह्यात अज्ञात आजाराचा धुमाकूळ

कोरोना महामारीमुळे संपूर्ण जग दोन वर्ष ठप्प होते. यामुळे जगभरात मोठ्या प्रमाणात लोक मृत्युमुखी पडले होते. भारतातही या साथरोगाने थैमान मांडले होते. प्राणवायूचा तुटवडा, रुग्णालयातील खाटांचा अभाव, औषधे, लसींचा अभाव यामुळे हाहाकार माजला होता. भौतिक अंतर राखण्यासाठी देशभरात टाळेबंदी करण्यात आली होती. या साथरोगाचा उगम चीनमधून झाल्याचे सर्वांना माहीत आहे. या आजारावर नियंत्रण मिळविल्यानंतर आता एचएमपीव्ही म्हणजे ह्युमन मेटान्यूमोनिया व्हायरस हा नवीन विषाणूजन्य आजार जगभर वेगाने पसरत आहे. याचा उगम देखील चीनमध्येच झाला आहे. हा आजार कशामुळे होतो याचे निदान अजून झालेले नाही. त्यामुळे त्याच्यावर औषध देखील उपलब्ध नाही. या आजाराचे रुग्ण भारतात आणि त्यातही नागपुरात आढळल्याच्या बातम्या वृत्तपत्रातून वाचनात आल्या. दुसरीकडे बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातील तीन गावांत नवीनच आजाराचे रुग्ण आढळले आहेत. या आजाराची लागण झालेल्या रुग्णांचे केस केवळ तीनच दिवसांत गळून पडतात व संपूर्ण टक्कल पडते, असे गावकऱ्यांनी सांगितले. हा आजार कशामुळे होत आहे हे देखील कोणालाच माहीत नाही. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शेगाव तालुक्यातील बोंडगाव, कालवड आणि हिंगणा या गावात या अज्ञात आजाराने थैमान घातले आहे. आधी डोके खाजवणे, त्यानंतर केस हाती येणे आणि तिसऱ्या दिवशी केसगळती होऊन टक्कल पडते. या आजाराची या तिन्ही गावांतील लागण होऊन जवळपास ३० जणांचे टक्कल पडले आहे. त्यात महिलांचाही समावेश आहे. आरोग्य विभागाने या आजाराचे सर्वेक्षण सुरू केले आहे.



बोंडगाव येथे केलेल्या सर्वेक्षणात ३० जणांना या आजाराची बाधा झाल्याचे दिसून आले. आरोग्य पथकाकडून आजाराची लक्षणे शोधून उपचार केले जात आहेत. दूषित जलस्रोतामुळे हा आजार होत आहे का? पाण्याचा जडपणा जास्त प्रमाणात आहे का? याबाबत आरोग्य विभाग माहिती संकलित करीत आहे. या गावातील पाण्याचे नमुने तपसाण्यासाठी पाठविण्यात आले आहेत. तर, शाम्पूमुळे असा प्रकार घडण्याची शक्यता त्वचारोगतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. दुसरे असे की, ही गावे खारपाणपट्ट्यातील आहेत. तेव्हा, भूगर्भातील क्षारयुक्त पाण्यामुळे ही केसगळती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या घटनेची माहिती मिळताच आरोग्य पथके या गावात पोहोचली. त्यांनी सर्वेक्षणासोबतच आरोग्यविषयक सल्ला रुग्ण व इतर गावकऱ्यांना दिला आहे. लक्षणांनुसार औषधोपचार देखील सुरू केल्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. दीपाली बाहेकर यांनी सांगितले.

काही वर्षांपूर्वी वाशीम जिल्ह्यातील हिवरापेन येथील नागरिकांना डेंटलफ्लोरॅसिस या आजाराने ग्रासले होते. या आजारात हाडे ठिसूळ होणे, दात पडणे, असे प्रकार होत होते. त्यामुळे वय वर्ष ३ ते ३५ गटातील मुले, युवक व नागरिकांचे दात पडून त्यांना अकाली वृद्धत्व येत होते. या भयंकर आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी वाशीम जिल्हा परिषद व शासनाने नांदेड येथील एका संस्थेकडून सर्वेक्षण केले होते. त्यात गावातील जलस्रोतात फ्लोराईडचे प्रमाण जास्त असल्याने ते पाणी प्यायल्याने हा आजार गावकऱ्यांना जडल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर तो जलस्रोत बंद करून जलस्वराज्यच्या माध्यमातून गावाला पिण्याचे शुद्ध पाणी नळयोजनेतून पुरविण्यात आले. त्यामुळे या आजारावर नियंत्रण मिळविणे शक्य झाले. त्याचप्रमाणे या तिन्ही गावांतील जलस्रोतातील पाण्याची तपासणी करणे आवश्यक आहे. तसेच, गावातील दूषित पाणी जलस्रोतांजवळ सोडले जाऊ नये, याची खबरदारी ग्राम पंचायतने घेतली पाहिजे. कारण, दूषित पाणी जलस्रोतांजवळ सोडल्यास ते जमिनीत मुरून त्या जलस्रोताद्वारे पुन्हा नागरिकांच्या वापरात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे केसगळती होत असल्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. तेव्हा, जिल्हा परिषदेच्या आरोग्य, ग्रामीण पाणीपुरवठा आणि भूगर्भशास्त्रज्ञांनी याकडे विशेष लक्ष देऊन ही समस्या अधिक तीव्र रूप घेण्यापूर्वीच सोडवावी, अशी अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त करावीशी वाटते !

८८०६००६१४९

---

## दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

# दिल्लीत तीन राष्ट्रीय पक्षांची परीक्षा

संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीची घोषणा निवडणूक आयोगाने मंगळवारी केली. ७० सदस्यीय दिल्ली विधानसभेसाठी ५ फेब्रुवारीला एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. ८ फेब्रुवारीला होणाऱ्या मतमोजणीत दिल्लीच्या जनतेला कौल कुणाला मिळाला, याचे उत्तर मिळणार आहे. दिल्ली विधानसभा ही अतिशय छोटी विधानसभा आहे. दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जाही नाही. मात्र तरीसुद्धा दिल्लीच्या निवडणुकीकडे संपूर्ण देशाचे लक्ष राहणार आहे. कारण दिल्लीच्या निवडणूक निकालाचा राष्ट्रीय राजकारणावर प्रत्यक्ष नसला तरी काही प्रमाणात अप्रत्यक्ष परिणाम होणार आहे.

दिल्ली निवडणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अन्य लहान मोठे पक्ष रिंगणात उतरणार असले तरी दिल्लीत आप, काँग्रेस आणि भाजपा या तीन प्रमुख राष्ट्रीय पक्षांमध्ये खरी लढत होणार आहे. आतापर्यंत देशातील कोणत्याही राज्यात तीन प्रमुख राष्ट्रीय पक्ष पूर्ण ताकदीने निवडणूक रिंगणात उतरले नव्हते. काही राज्यांत भाजपा आणि काँग्रेससोबत प्रादेशिक पक्ष निवडणूक लढवत होते. पण देशाची राजधानी असलेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत आप, काँग्रेस आणि भाजपा अशा तीनही राष्ट्रीय पक्षांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

दिल्लीत जवळपास १२ वर्षांपासून आपची सत्ता आहे, तर काँग्रेस तेवढ्याच वर्षांपासून सत्तेपासून वंचित आहे. भाजपाला तर दिल्लीत सत्ता गमावून जवळपास २७ वर्षे झाली आहेत. त्यामुळे आपसमोर आपली सत्ता कायम ठेवण्याचे, भाजपासमोर सत्ता मिळवण्याचे तर काँग्रेससमोर आपले खाते उघडण्याचे आव्हान आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीत माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे आपचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा आहे. मात्र भाजपा आणि काँग्रेसजवळ मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार नाही. भाजपा ही निवडणूक पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नावावर आणि चेहऱ्यावर लढवत आहे.

दिल्लीत एक तर आप जिंकू शकतो वा भाजपा, मात्र काँग्रेसची दूरदूरपर्यंत कोणतीच शक्यता नाही. त्यामुळे काँग्रेसला तशीही मुख्यमंत्रिपदाच्या उमेदवाराची गरज नाही. २०१५ आणि २०२० च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला दिल्लीत आपले खाते उघडता आले नव्हते, एकही जागा जिंकता आली नव्हती. त्यामुळे काँग्रेसजवळ तसेही गमावण्यासारखे काही नाही. काँग्रेसने यावेळी एकही जागा जिंकत आपले खाते उघडले तरी ती त्यांच्यादृष्टीने मोठी उपलब्धी म्हणावी लागेल.

हरयाणा आणि महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत आपली सत्ता कायम ठेवण्यात भाजपाला यश मिळाले होते, त्यामुळे यावेळी भाजपासमोर दिल्ली जिंकण्याचे मोठे आव्हान आहे. दिल्ली विधानसभा निवडणूक भाजपाने जिंकली तर एकप्रकारे भाजपाच्या दृष्टीने ती विजयाची हॅट्ट्रिक ठरणार आहे. विशेष म्हणजे २०१४, २०१९ आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत दिल्लीतील सातपैकी सातही जागा जिंकत भाजपाने इतिहास घडवला होता. लोकसभेच्या सातही जागा जिंकणाऱ्या भाजपाला मात्र २०१५ आणि २०२० च्या विधानसभा निवडणुकीत अपेक्षित यश मिळाले नव्हते, उलट भाजपाचा दारुण पराभव झाला होता. २०१५ च्या विधानसभा निवडणुकीत आपने ७० पैकी ६७ जागा जिंकल्या होत्या, भाजपाला फक्त तीन जागा मिळाल्या होत्या. काँग्रेसला तर एकही जागा जिंकता आली नव्हती. २०२० च्या विधानसभा निवडणुकीत आपच्या काही जागा कमी झाल्या आणि भाजपाच्या वाढल्या. आपने यावेळी ७० पैकी ६२ जागा जिंकल्या, तर भाजपाला ८ जागा मिळाल्या. यावेळीही काँग्रेसला एकही जागा मिळाली नव्हती. २०१३ च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत आपने पहिल्यांदा काँग्रेसचा पराभव केला होता. यावेळी काँग्रेसने ८ जागा जिंकल्या होत्या. १५ वर्षांनंतर दिल्लीत काँग्रेसचा पराभव झाला होता. १९९८ मध्ये भाजपाचा पराभव करत दिल्लीत काँग्रेसने पहिल्यांदा सत्ता मिळवली, त्यानंतर सलग १५ वर्षे दिल्लीची सत्ता आपल्या हातात ठेवली. शीला दीक्षित यांनी १५ वर्षे दिल्लीचे मुख्यमंत्रिपद भूषवले होते. आज दिल्लीत काँग्रेसचे नेतृत्व करणारे संदीप दीक्षित शीला दीक्षित यांचेच पुत्र आहेत.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत दिल्लीत आप आणि काँग्रेस यांची आघाडी होती. आप काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडीचा भाग होता. मात्र दिल्लीत आघाडी करून निवडणूक लढणाऱ्या या दोन पक्षांनी पंजाबमध्ये मात्र एकदुसऱ्याविरुद्ध दंड थोपटले होते. दिल्लीतील लोकसभेच्या सातपैकी आपने चार तर काँग्रेसने तीन जागा लढवल्या होत्या. दिल्लीत एकत्र लढणाऱ्या या दोन पक्षांना फारशी समाधानकारक कामगिरी करता आली नव्हती, एकही जागा या आघाडीला मिळाली नव्हती. आता विधानसभा निवडणुकीत तर आप आणि काँग्रेस हे दोन पक्ष एकदुसऱ्याविरुद्ध लढत आहेत. नुसते लढतच नाही तर काँग्रेस नेते आपचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांच्यावर हल्लाही चढवत आहेत. काँग्रेस नेते अजय माकन आणि संदीप दीक्षित यांनी तर केजरीवाल यांना राष्ट्रविरोधी म्हणायलाही कमी केले नाही. यावरून आप आणि काँग्रेसमध्येच जुंपली आहे. आपने तर काँग्रेसला इंडिया आघाडीतून बाहेर काढण्याची मागणी आघाडीतील अन्य घटकपक्षांकडे केली आहे. आपने नंतर हा मुद्दा लावून धरला नाही, हा भाग वेगळा.

काँग्रेसचे राष्ट्रीय नेतृत्व केजरीवाल आणि आम आदमी पक्ष यांच्याविरुद्ध काही प्रमाणात सहानुभूती ठेवून असले तरी दिल्ली काँग्रेसचे नेतृत्व करणारे मात्र आप आणि केजरीवाल यांच्या विरोधात आहे. लोकसभा निवडणुकीतही आपसोबत आघाडी करायला दिल्ली प्रदेश काँग्रेस नेत्यांचा विरोध होता. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत आपचे उमेदवार असलेल्या मतदारसंघात काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी आपच्या उमेदवारांचे काम केले नाही. याचा परिणाम म्हणून काँग्रेसचे उमेदवार असलेल्या लोकसभा मतदारसंघात आपच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी दुर्लक्ष केले होते.

२०१५ आणि २०२० च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत यावेळी आप अडचणीत सापडली आहे. आपचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील जवळपास अर्धा डझन मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले, या सर्वांना अटक झाली. एवढेच नाही तर काही महिने तुरुंगातही राहावे लागले. केजरीवाल आणि अन्य नेते सध्या जामिनावर असले तरी भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे २०१५ आणि २०२० च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत यावेळी केजरीवाल आणि आपची प्रतिमा डागाळली आहे, दिल्लीच्या जनतेचा त्यांच्यावरचा विश्वास डळमळीत झाला, हे निश्चित. याचा फायदा यावेळी भाजपाला मिळण्याची शक्यता आहे. आतापर्यंत लोकसभा निवडणुकीत जवळ असलेली दिल्ली विधानसभा निवडणुकीत मात्र भाजपापासून दूर जात होती, ती यावेळी जवळ येण्याची शक्यता आहे. भाजपाने यावेळी दिल्ली विधानसभेची निवडणूक जिंकली तर जवळपास २७ वर्षांचा भाजपाचा राजकीय वनवास संपणार आहे. सोबतच आप आणि केजरीवाल यांचा राजकीय वनवास सुरू होणार आहे.

९८८१७१७८१७

---

## भीती नको; सतर्कता पाळा

चीनमध्ये धुमाकूळ घालणाऱ्या एचएमपीव्ही विषाणूने भारतातही प्रवेश केल्याने नागरिकांची चिंता वाढली असली तरी घाबरण्याचे कारण नाही. मात्र नागरिकांना योग्य ती खबरदारी घ्यावीच लागेल. या विषाणूची लक्षणे कोरोनासारखीच असल्याने कोरोना काळात नागरिकांना ज्या मार्गदर्शक सूचना सरकारकडून देण्यात आल्या होत्या त्याचे नागरिकांनी कठोर पालन करावे. गर्दीत जाणे टाळावे. गर्दीत जावेच लागणार असेल तर मुखाच्छादन घालूनच जावे. सॅनिटायझरचा वेळोवेळी वापर करावा. आरोग्य यंत्रणेने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे. या विषाणूचा सामना करण्यास आपली आरोग्य यंत्रणा सक्षम आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जायचे कारण नाही. नागरिकांनी आरोग्य यंत्रणेला आणि प्रशासनाला योग्य ते सहकार्य केल्यास या विषाणूचा मुकाबला करणे सहज शक्य आहे. आधुनिक युगात अशाप्रकारचे विषाणू येतच राहणार आहेत. त्यांच्याशी लढायचे असेल तर आता सतर्कता बाळगणे हाच उपाय आहे. भीती नको पण सतर्कता पाळा, एचएमपीव्ही विषाणू टाळा, हा नवा मंत्र सर्वांनी अंगीकारला पाहिजे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

●● ●●

## योजनेचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचायला हवा

प्रत्येक सरकार हे गरिबांसाठी, गरजू पात्र व्यक्तींसाठी वेगवेगळ्या योजना आखत असते आणि त्या योजना प्रभावीपणे राबवल्या सुद्धा जातात. या अशा योजनेमुळे निराश्रित आणि दारिद्र्यामध्ये जीवन जगणाऱ्या गरजू लोकांना मोठा आधार मिळतो आणि आणि सन्मानाने जगता येते. सरकार तर योजना सुरू करते मात्र या योजना खरंच गरीब आणि गरजू लोकांपर्यंत पोहोचतात का, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

नुकतीच महाराष्ट्र सरकारने 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना सुरू केली. राज्यातील २१ ते ६० वर्षांपर्यंत सर्व पात्र महिलांना या योजनेचा लाभ देण्यात आला. प्रत्येक महिलांच्या खात्यामध्ये शासन पंधराशे रुपये टाकत असल्याने अनेक गरजू महिलांची दिवाळी साजरी झाली. मात्र या योजनेचा बऱ्याचशा श्रीमंत लोकांनीही फायदा घेतला. अनेक महिलांचे पती शासकीय नोकरीवर, घरी शेतीवाडी आणि घरी मोठे मोठे वाहने असतानाही या महिलांनी योजनेचा फायदा घेतला अशी बातमी कानावर आली आणि खरंच खूप वाईट वाटले. आज बंदी भागातील एक गरीब महिला आमच्या दुकानात आली आणि तिने आपली आपबिती सांगितली. एक वेडसर मुलगी घेऊन ती आपला कुटुंबाचा गाडा हाकत होती. पालन पोषण करणारे कोणीही नाही. घरी खाण्याची सुद्धा दैनावस्था. अशा स्थितीमध्ये त्या महिलेला या लाडकी बहिणीचा लाभ तर मिळाला नाही वरून कागदपत्र जुळवण्यासाठी सुद्धा तिला कोणीही मदत करत नव्हते. प्रचंड त्रासून गेलेल्या त्या महिलेकडे पाहून कोणालाही कीव येईल अशी स्थिती होती. ही स्थिती पाहून खरंच खूप वाईट वाटले. आम्ही तर जमेल तशी तिला मदत केली. मात्र समाजात आजही अशा अनेक महिला आहेत त्यांना अशी काही योजना सुरू आहे हे सुद्धा माहीत नाही. ज्या नागरिकांना या योजनेची खरंच गरज आहे त्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही आणि ज्यांना गरज नाही ते राजरोसपणे योजनेचे पैसे लाटत आहेत. हे चित्र कुठेतरी बदलायला हवे आणि गरजू नागरिकांपर्यंतच योजनेचा लाभ पोहोचायला हवा.

**मोहन कळमकर**/७३८५८६१४४६

## वाचक पत्रे

●● ●●

## 'नो विन - नो पे' धोरण अंगीकारा

'सातत्य न दाखवणाऱ्या खेळाडूंना घरी बसवा' हा सडेतोड अग्रलेख नुकताच वाचला. ऑस्ट्रेलियामधील पाचव्या कसोटीतून 'आतल्या आवाजाला' स्मरून रोहित शर्माने स्वतःला 'वगळून' घेतले, तेव्हा त्याने केलेला कांगावेखोरपणा मनोरंजक होता. गेली दोन वर्षे सातत्याने फेल गेलेले रोहित शर्मा आणि विराट कोहली हे खेळाडू संघात 'आरक्षण' असल्यासारखे चिकटून बसले आहेत. सध्या क्रिकेट खेळाडूंना पैशासाठी कसोटी क्रिकेट महत्त्वाचे वाटत नाही. आयपीएल, टी-२० आणि एकदिवसीय सामन्यांमध्ये कमी श्रमात भरपूर पैसा मिळतो, त्यातही जय-पराजयाची चिंता नाही. शिवाय मॉडेलिंगचा पैसा वेगळा. कसोटीत श्रम जास्त आणि पैसा तुलनेने कमी.

अग्रलेखात म्हटल्याप्रमाणे सर्व नियम लागू करणे आवश्यक आहेच. याशिवाय या खेळाडूंकडून चांगली कामगिरी करवून घ्यायची असेल तर आणखी एक कठोर उपाय योजणे आवश्यक आहे. खाजगी कंपन्यांमध्ये 'नो वर्क-नो पे', असते तसेच यांना 'नो विन-नो पे', अनिर्णीत सामन्यात ५० टक्के आणि हरलेल्या सामन्यात २५ टक्के मानधन मिळण्याची अट ठेवली पाहिजे. ज्यांना ही अट मान्य असेल त्यांनीच खेळावे अन्यथा घरचा रस्ता धरावा. सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर असे करायला काहीही हरकत नसावी.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### १२३ पदांसाठी समुपदेशाने पदोन्नती

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील विविध पदाच्या पदोन्नत्याा बुधवार ८ जानेवारी रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथूर यांच्या मार्गदर्शनाखाली सम पदेशनाने जिल्हा परिषदेच्या सभागृहात पारदर्शक पद्धतीने पुर्ण केल्या.

यामध्ये अराजपत्रित मुख्याध्यापक २, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी ४, कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी १०, केंद्रप्रमुख २९, उच्चश्रेणी मुख्याध्यापक (मराठी) ६६, उच्चश्रेणी मुख्याध्यापक (उर्दू) १२ अशा एकुण १२३ पदांची पदोन्नती प्रक्रिया बुधवारी पुर्ण करण्यात आली. या प्रक्रियेत मागील काही वर्षापासुन रिक्त असलेल्या पदांवर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आल्या.

पदोन्नती प्रक्रिया संपल्यानंतर सीईओ श्रीमती नतिशा माथुर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) ओमप्रकाश यादव, प्राथमिक शिक्षणाधिकारी सुनिल पोलास, योजना शिक्षणाधिकारी संजय ससाने, यांनी नव्याने पदोन्नत कर्मचाऱ्यांना विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी करावयाच्या कार्यवाही बाबत मार्गदर्शन केले. पदोन्नती प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी शिक्षण विभागातील सर्व कर्मचारी यांनी प्रयत केले.

### लायन्सव्दारे जयपूर येथे शिबीराचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** लायन्स क्लब पुणे सुप्रिम, श्री शिवाजी महाविद्यालय परभणी व लायन्स क्लब परभणी मेन यांच्या संयुक्त विद्यमाने ३ फेब्रुवारी रोजी परभणीत दिव्यांग बांधवांसाठी मोफत कृत्रिम पायरोपण (जयपुर फुट) पोलिओ कॅलिपर्स शिबीर आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती लायन्स क्लब परभणी मेनचे अध्यक्ष ला. अरुण (अवि) टाक यांनी दिली.

या शिबीरात १०० जणांची नोंदणी करण्यात येणार आहे. त्याासाठी गरजू नागरीकांना ला. अरुण टाक (९५४५२२२२५५), ला. रामेश्वर मणियार (८६९८९५१८८८), ला. सुशिल मुंदडा (८६८९८२०४४४) व ला. डॉ. अस्मिता सुराणा (९८२२०३७२०५) यांच्याशी संपर्क साधून नोंदणी करावी लागणार आहे. दरम्यान, आधूनिक जयपूर फूट हा कृत्रिम पाय लावल्यानंतर कुठलाही आधार न घेता रुग्ण चालू, धावू शकतो, सायकल चालवू शकतो. अपघात, मधूमेह, रक्तवाहिन्यांचे आजार, गँगरीन आदी कारणांमुळे हात-पाय काढलेल्या रुग्णांना या अद्यावत व आधूनिक प्रक्रियेने तयार होणाऱ्या जयपूर फुटमुळे नवीन जीवन मिळू शकेल. त्याामुळे गरजूंनी या शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन लायन्स क्लबच्यावतीने करण्यात आले आहे.

### मटकऱ्हाळा-आनंदवाडी रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करा- प्रहार जनशक्ती पक्षाची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** तालुक्यातील मटकऱ्हाळा ते आनंदवाडी या रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम तात्काळ पूर्ण करावे, अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्षाने केली आहे.

जिल्हा प्रमुख शिवलिंग बोधने, तालुका प्रमुख उध्दव गरुड, शहर चिटणीस वैभव संघई, मटकर्हाळा शाखा प्रमुख माऊली गरुड, प्रकाशराव गरुड, संतोषराव गरुड, प्रल्हाद गरुड, संतोष गरुड, सुरेश उत्तमराव गरुड आदींच्या एका शिष्टमंडळाने गुरूवारी (दि.९) सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांना आपल्या मागणी संदर्भातील निवेदन सादर केले. त्याातून, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने एप्रिल-मे २०२४ ला तालुक्यातील मटकऱ्हाळा ते आनंदवाडी या रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम सुरु करण्यात आले. हे काम करतांना कंत्राटदाराने या रस्त्याावर फक्त खडी टाकली. खडी टाकून अर्धवट सोडून दिलेल्या कामामुळे या रस्त्याावरुन ये-जा करणे धोक्याचे बनले आहे. या दरम्यान अनेक अपघातही झाले आहेत. संबंधित कंत्राटदारास व सार्वजनिक बांधकाम विभागास अनेकदा विनंती करुनही हे काम अजून सुरु करण्यात आलेले नाही. ही अत्यांत गंभीर बाब असून ते तात्काळ सुरु करावे, अशी मागणी या निवेदनाद्वारे केली आहे.

दरम्यान, मटकऱ्हाळा - आनंदवाडी या रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण न झाल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर डफली बजाओ आंदोलन व कार्यालयाला टाळे ठोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा या निवेदनाद्वारे दिला आहे.

### धावत्या बसने अचानकपणे घेतला पेट चालकाच्या प्रसंगावधानामुळे अनर्थ टळला

**परभणी,/प्रतिनिधी :** तालुक्यातील दैठणा येथे धावत्याा बसने अचानकपणे पेट घेतला. परंतु, चालकाने प्रसंगावधान राखून तात्काळ गाडी थांबवली व प्रवाशांना तातडीने खाली उतरवून ग्राम स्थांच्या मदतीने आग विझवली. त्याामुळे मोठा अनर्थ टळला.

गंगाखेडहून परभणीला जाणाऱ्या या बसमध्ये ३० प्रवासी होते. ही बस दैठणा येथे किनारा बारच्या जवळ आली असता बसला अचानकपणे आग लागली. ही बाब लक्षात येताच चालकाने स्वत: खाली उतरून सर्व प्रवाशांना बस रिकामी करण्यास सांगितले. त्याानंतर चालकाने आवाज देताच ग्रामस्थांनी दुचाकीवरून पाणी आणून आग विझविण्यासाठी प्रयत केले. ग्रामस्थांसह काही प्रवाशांनी देखील मदत केल्यामुळे ही आग विझली. चालकाच्या प्रसंगावधानामुळे ३० प्रवाशांचे प्राण वाचले.

### प्रणिल गिल्डा यांना महेश प्रतिभा पुरस्कार

**सेलू,/प्रतिनिधी :** सेलू येथील भूमीपुत्र तथा मिरज येथील उपविभागीय पोलीस अधिकारी प्रणिल गिल्डा यांना महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभा यांच्या वतीने सेठ सितारामजी सुखदेवजी बिहाणी (बंगडीवाला) स्मृती प्रित्यार्थ दिला जाणारा महेश प्रतिभा गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. प्रदेशाध्यक्ष मधुसूदन गांधी, प्रदेश मंत्री सत्यानारायण सारडा यांनी पुरस्कार निवडीबाबत पत्राद्वारे कळविले आहे. सार्वजनिक प्रशासन क्षेत्रातील विशेष कामगिरीबद्दल प्रणिल गिल्डा यांना महेश प्रतिभा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. छत्रपती संभाजीनगर येथील चिकलठाणा एमआयडीसी परिसरातील महेश सांस्कृतिक भवन येथे रविवारी, ११ जानेवारी रोजी सायंकाळी पाच वाजता आयोजित विशेष समारंभात प्रदान करण्यात येणार आहे. श्री. गिल्डा यांना याआधी माहेश्वरी प्रोफेशन फोरम पुणे यांचा उत्कृष्ट युवा अधिकारी पुरस्कार, गडचिरोली येथे कार्यरत असताना विशेष कामगिरी केल्याबद्दल पोलीस महासंचालक पदक तसेच पोलीस विभागातील विशेष सेवा पदकानेही त्यांचा सन्मान झालेला आहे. पुरस्काराबद्दल श्री गिल्डा यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

# महाडिबिटी पोर्टल वरील शेतकऱ्यांची सोडत रखडली

## संकेतस्थळावर नोंदणी केलेले शेकडो शेतकरी लाभाच्या प्रतिक्षेत

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ,/प्रतिनिधी-:** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या विविध योजनांची नोंदणी शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवर करण्यात येते परंतु मागील अनेक महिन्यापासून या पोर्टलवर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची सोडत झाली नसल्यामुळे शेकडो शेतकरी अजूनही या लाभाच्या योजनेच्या प्रतीक्षेत आहेत त्याामुळे कृषी विभागाने या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देऊन महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी मागणी केलेल्या शेतकऱ्यांची सोडत सुरू करून शेतकऱ्यांना त्वरित लाभ देण्याची मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

शेतकऱ्यांसाठी ोणत्याा योजना आहेत कांदा चाळ, शेततळे, बियाणे, कीटकनाशके, सौर कुंपण, फळबाग लागवड, वृक्ष लागवड, सिंचन विहीर, ठिबक सिंचन, तुषार सिंचन, पाईप, मोटार, इंजिन व सिंचनाची ईतर साधने आणि उपकरणे, कृषी यांत्रिकीकरण व ट्रॅक्टर चलित नांगर, रोटावेटर, मोगडा, मळणी यंत्र व ईतर यंत्र, लहान मोठे ट्रॅक्टर, स्वयंचलित शेती यंत्र, चार्जिंग फवारे, कडबा कुट्टी, पेरणी यंत्र इत्यादी. नोंदणी एकाच छताखाली शेतकऱ्यांच्या या विविध योजनांची नोंदणी आता वेगवेगळ्या प्रकारे करण्याची आवश्यकता नसून ती महाराष्ट्र शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवर करावी लागते व या नोंदणीची प्रत्येक महिन्यात किमान दोन वेळेस लॉटरी पद्धतीने निवड करुन लाभार्थी निवडले जात असत. किती मिळते अनुदान महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या शेतकऱ्यांसाठीच्या विविध अनुदानित योजना आहेत त्याामध्ये अनुसूचित जाती आणि जमातीच्या लाभार्थी शेतकऱ्यांना प्रत्येक साहित्या खरेदीवर ५०% पर्यंत अनुदान दिले जाते तर सर्वसाधारण शेतकऱ्यांना ४०% पर्यंत अनुदान दिले जाते काही योजनांमध्ये शेतकऱ्यांना ८०% पर्यंत अनुदान दिले जाते. शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करणे आणि शाश्वत कृषी पद्धतींना पुढे नेण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र सरकारने पोर्टल शेतकरी योजना सुरू केली. हे एक डिजिटल नेटवर्क आहे जे शेतकऱ्यांना राज्य सरकारच्या सवलती, कृषी अनुदान आणि इतर कृषी योजनांशी जोडते.राज्यातील सर्व शेतकऱ्यांना महाराष्ट्र सरकारच्या महाडीबीटी शेतकरी योजना अंतर्गत कृषी यंत्रांच्या खरेदीसाठी आर्थिक मदत मिळते. सध्या या योजनामुळे शेतकऱ्यांनाही खूप मदत होत आहे. त्याामुळे शेतकऱ्यांसाठी हा एक महत्त्वाची योजना ठरत आहे. शेतकऱ्यांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती उंचावण्यासाठी आणि त्याांना लवचिक आणि स्वावलंबी बनवण्यासाठी राज्य सरकार वेळोवेळी शेतकऱ्यांसाठी नवनवीन योजना राबवते. राज्यातील शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांना उत्तर देण्यासाठी राज्य सरकारच्या कृषी विभागाने महाडबीटी फार्मर लॉगिन सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला. काही वर्षांपूर्वी, शेतकऱ्यांना विविध




पोर्टल्सद्वारे कृषी योजनांबद्दल जाणून घ्यायचे आणि अर्ज करायचे होते. यातील अनेक योजनांची माहितीही शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नसल्याने ते योजनेच्या लाभापासून वंचित आहेत. शेतकऱ्यांना विविध योजनांसाठी अनेक पोर्टलवर जावे लागू नये आणि कृषी योजनांचे फायदे गमावू नयेत, यासाठी राज्यात सुरू करण्यात आलेल्या सर्व कृषी योजनांची माहिती वर उपलब्ध करून दिली जाते. या प्लॅटफॉर्मद्वारे, शेतकरी एकदाच नोंदणी करू शकतात आणि आगामी सर्व कृषी योजनांचा लाभ घेऊ शकतात.महाराष्ट्र सरकारचे नाविन्यपूर्ण शासकीय महाडबीटी फार्मर पोर्टल हे एक प्रकारचे व्यासपीठ आहे जे योजनांद्वारे सामान्य जनतेला थेट लाभ देण्यासाठी डिझाइन केलेले आहे.शेतकऱ्यांना विविध कृषी योजनांसाठी अनेक पोर्टलवर जाण्यापासून वाचवण्यासाठी, महाडीबीटी पोर्टल शेतकरी योजनेचे प्राथमिक उद्दिष्ट राज्यातील शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या सर्व कृषी योजनांची माहिती तसेच अर्ज प्रक्रिया आणि आर्थिक लाभ वितरण हे एकाच पोर्टलवर दिले जाते. सन २०२४ या गेली वर्षभरामध्ये हजारो शेतकऱ्यांनी या पोर्टलवर विविध योजनांची व साहित्याांची मागणी केली आहे. परंतु त्याा संदर्भात शासनाने अद्याप पर्यंत लॉटरी पद्धतीची सोडत केलेली नसल्यामुळे, सर्व शेतकरी लाभापासून वंचित आहेत. यासाठी शासनाने तात्काळ महाडीबीटी पोर्टल वरील शेतकऱ्यांची सोडत सुरू करण्याची मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

## पूर्णा पंचायत समिती अपहार प्रकरणी सहाय्यक लेखा अधिकारी यांना अटक

**पूर्णा,/प्रतिनिधी:** पूर्णा येथील पंचायत समितीच्या अपहार प्रकरणात पुर्णा पोलिसांनी पुर्णा पंचायत समितीचे सहाय्यक लेखाधिकारी एस.के. पाठक यांना अटक केली असून त्यांना पुर्णा न्यायालयाने सोमवार पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

पूर्णा पंचायत समिती कार्यालयांतर्गत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन मध्ये तत्कालीन दोन गटविकास अधिकारी तसेच लेखापाल व काही कर्मचारी आणि खासगी व्यक्ती अशा नऊ जणांनी पेन्शन धारकांच्या १ कोटी ८३ लाख ७७ हजार ८४४ हजार रुपयांचा अपहार केला आहे. दरम्यान, अखेर तीन महिन्यानंतर सदर पूर्णा पंचायत समिती कार्यालयाअंतर्गत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन घोटाळा प्रकरणी सुमारे पावणे दोन कोटी रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी गटविकास अधिकारी मयुरकुमार आंदेलवाड यांनी मंगळवार ७ जानेवारी रोजी पूर्णा पोलिस ठाण्यात पंचायत समिती मधील तत्कालीन गटविकास अधिकारी सौ एस. के. वानखेडे, जे.व्ही. मोडके,वरिष्ठ सहाय्यक एम. बी. भिसे, सहाय्यक लेखा अधिकारी एस. के.पाठक, अरविंद नामदेव अहिरे, सोनाजी नामदेव भोसले, नागेश निळकंठ नावकीकर, जयश्री टेलरींग, शेख अहर शेख समद या नऊ जणांविरुद्ध विविध कलमाखाली गुन्हा दाखल झाल्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.समाधान पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी पोनि विलास गोबाडे यांनी व त्यांच्या पथकाने यातील लेखापाल एस.के पाठक यांना ताब्यात घेऊन गजाआड केले आहे. पोलीसांनी ९ जानेवरी गुरुवार रोजी सदरील प्रकरणातील ताब्यात घेतलेल्या एकाला पूर्णा न्यायालयांने त्याना सोमवार पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## हंपीपीठाचे श्री जगदगुरु शंकराचार्य यांचे धनगर टाकळीत आगमन

**पूर्णा,/प्रतिनिधी :** श्री सद्गुरू दाजी महाराज जन्मोत्सव व वैदिक गुरुकुलचा रौप्य महोत्सव या निमित्ताने ९ जानेवारी गुरुवार रोजी श्रीमद् जगद्गुरु शंकराचार्य हंपी विरूपाक्ष , हम्पीपीठ यांचे श्रीक्षेत्र धनगर टाकळी येथे आगमन झाले. भारतीय संस्कृतीनुसार त्याांचे भव्य स्वागत करण्यात आले .

श्रीक्षेत्र धनगर टाकळी येथे श्री सद्गुरू दाजी महाराज यांचा १६५ वा जन्मोत्सव व सच्चीदानंद वेद स्वाध्याय प्रतिष्ठानचा रौप्य महोत्सव २ ते १४ जानेवारी या कालावधीत संपन्न होत आहेत. पूर्वार्धात ऋग्वेद संहिता पद क्रम पाठ षडंगसहित पारायण पूर्ण झाले. उत्तरार्धात भागवतभूषण ज्योतिषाचार्य पंडित अतुल शास्त्री भगरे गुरुजी यांची दुपारी



३ ते ६ या वेळेत भागवत कथा ,सकाळच्या सत्रात ९ ते १२ या वेळेत श्री लक्ष्मी नारायण पंचायतन पंचकुंडी यज्ञ , विविध सहस्त्रार्चन, दैनंदिन रात्री ८ ते १० या वेळेत कीर्तनकारांची नामसंकीर्तन सेवाही ७ ते १३ जानेवारी या काळात येथे असा अध्यात्मजागर चालू आहे.

दरम्यान,या सोहळ्यात गुरुवारी (दि.९ ) श्रीमद् जगद्गुरु शंकराचार्य हंपी विरूपाक्ष ,हंपीपीठ (कर्नाटक) यांची श्रद्धेय उपस्थिती लाभली.सवाद्य वैदिक मंत्राघोषात विधिवत पारंपरिक पद्धतीने जगद्गुरुचें स्वागत करण्यात आले. संस्थानाधिपती वेदमूर्ती उमेशमहाराज टाकळीकर, सौ.अपर्णामाई ,वेदमूर्ती अवधूतमहाराज,सौ. अश्विनी, प्रांजली या संयोजक कुटुंबीयांसह सद्गुरू भक्त यांनी पुष्पार्चन केले. भागवत कथा श्री जगद्गुरु यांनी श्रवण केली. विशेष शुक्रवारी दि.१० जानेवारीला सोहळ्यात सकाळच्या सत्रात चंडीयाग विधी पूर्ण झाल्यानंतर संयोजकांच्या वतीने श्रीमद् जगद्गुरू यांची पाद्यपूजा करण्यात येणार आहे .यावेळी जगद्गुरु यांचे आशीर्वाचन होणार आहे. कुंकुमार्चन व महाआरतीनंतर श्री जगद्गुरु यांच्या दर्शनाचा लाभ भाविकांना मिळणार आहे. नामसंकीर्तनात रात्री ८ वाजता ह.भ.प.सौ.रोहिणी परांजपे,पुणे यांचे नारदीय कीर्तन होणार आहे,अशी माहिती वेदमूर्ती अवधूत महाराज टाकळीकर यांनी दिली.

## बारदान्याअभावी सोयाबीन खरेदी रखडली- शेतकरी आला प्रचंड अडचणीत

**सेलू,/प्रतिनिधी:** शहरात नाफेड एजन्सीमार्फत सेयाबीन खरेदी केंद्रावर सोयाबीन खरेदी करण्यात येत असली तरी मात्र बारदान्याचे कारण करत सोयाबीन खरेदी एजन्सी करत नसल्याने शेतकरी आर्थीक संकटात सापडला असून सोयाबीन खरेदी सूरू करण्याची मागणी निवेदनाव्दारे गूरूवार ९ रोजी करण्यात आली आहे .शहरातील नाफेड एजन्सीमार्फत सोयाबीन खरेदी करण्यात येत आहे.मात्र एजन्सी चालक मात्र शासकिय नियम धाब्यावर बसवून शेतक-याच्या सोयाबीनची चाळणी ८० रूपये प्रति क्विटंल मजूरीचा भूर्दंड शेतक-याच्या माथी लादला जात आहे.आद्रताचा निकष शासनाने शिथील केला असला तरी एजन्सीचालक शेतक-यांचा माल खरेदी करत नाही.

नोंदणी केलेल्या शेतक-यांना संदेश पाठवला जात नाही,सेयाबीन रक्कम शेतक-याच्या खात्याात वर्ग होण्यास विलंब होत असून सदरिल एजन्सीला सोयाबीन खरेदी करण्याची आवश्यकता वाटत नसून केवळ शेतक-यांची पिळवणूक सदरिल एजन्सी केवळ बारदाना नसल्याचे कारण एजन्सीकडून देवून खरेदी बंद ठेवणे ही एक प्रकारे शेतक-यांची पिळवणूक करण्याचा प्रयत एजन्सी करत असून या एजन्सीवर शासनाचा कूठलाही अंकूश दिसत नसून सोयाबीन खरेदी तात्काळ सूरू करून शेतक-याची होणारी आर्थीक पिळवणूक थांबविण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे .यासाठी पंडीत आरकूले,गूलाब पौळ,सोनू शेवाळे,प्रकाश पौळ,आसाराम मगर,आबासाहेब सोळंके,डिगांबर पौळ,ईश्वर पौळ,फकिरराव पौळ,भारत पौळ आदींनी पूढाकार घेतला. तीन महिन्यात २२ दिवस खरेदी बंद नाफेड खरेदी एजन्सी मार्फत १५ ऑक्टोंबर रोजी सूरू करण्यात आले मात्र सदरिल केंद्र तीन महिन्यात २२ दिवस बंद असल्याने सेयाबीन विक्री करण्यासाठी शेतक-यांना आडचणी आल्या आहेत.४ हजार २०० शेतक-यांनी सोयाबीन ऑनलाईन नोंदणी केली तसेच १ हजार ६०० शेतक-यांना विक्रीसाठी संदेश पाठविण्यात आले तर ११ हजार ५०० क्विंटल सोयाबीन खरेदी करून ८०० शेतक-यांच्या खात्याावर रक्कम वर्ग करण्यात आली आहे.

## धानोरा बु.येथे खंडोबा पालखीनिमित्त राज्यमंत्री साकोरे यांनी घेतले दर्शन

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जागृत देवस्थान असलेल्या धानोरा (बुद्रुक) येथील खंडोबा देवस्थानच्या पालखी सोहळ्यानिमित्त माननीय राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी खंडेरायाचे मनोभावे दर्शन घेतले . तसेच गावातील समस्या जाणून घेऊन लवकरात लवकर सर्व समस्यांचे निराकरण करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी (दीदी सोबतचे महत्त्वाचे पदाधिकारी व वरिष्ठ कार्यकर्ते) गावचे माजी सरपंच श्री. कैलासजी खंदारे दरवर्षी या सोहळ्याला भाविक भक्तांची अलोट गर्दी असते. त्याचबरोबर गावातील कामानिमित्त बाहेरगावी असलेले सर्व कुटुंब आवर्जून खंडेरायाच्या दर्शनासाठी सहकुटुंब उपस्थित असतात. गावातील एक भव्य - दिव्य सोहळा या रूपाने साजरा करण्यात येतो. गावातील प्रत्येक घरासमोर रांगोळी घरांना फुलाचे हार असे प्रसन्न वातावरण असते. यावेळी गावकऱ्यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. सर्व गावकरी मोठ्या भक्ती भावाने एकत्रित येऊन पालखी सोहळ्यात सहभागी होतात व गावाच्या कल्याणासाठी प्रार्थना करतात.

## साने गुरुजी वाचनालयात ज्येष्ठ साहित्यीक प्रा.दिपक कासराळीकर यांची भेट

**पूर्णा,/प्रतिनिधी-** साने गुरुजी वाचनालय. जेष्ठ साहित्यिक प्रा. दिपक कासराळीकर भेट करण्यात आली होती.

दरम्यान पुस्तके संस्कार घडवितात माणसाला अंतर्मुख करतात शहरातील साने गुरुजी सार्वजनिक वाचनालयात नांदेड येथील साहित्यिक प्रा .दिपक कासराळीकर याचां ग्रंथभेट देऊन यथोचित सत्कार वाचनालयाचे उपाध्यक्ष व्यंकटराव मुळे याचां हस्ते करण्यात आला.

महाराष्ट्र शासना वतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभियानांतर्गत वाचनालयात ग्रंथ प्रदर्शन व विविध उपक्रम आयोजित करण्यात आले आहे. यावेळी सत्काराला उत्तर देताना प्रा. दिपक कासराळीकर यानीं आजच्या काळात वाचनाची आवड कमी झाल्यामूळे तरुण भरकटले आहेत. जगात सर्वात चांगली जागा म्हणजे ग्रंथालय होय असे सांगून पुस्तकांच्या सानिध्यात राहिल्यास माणूस खरा ज्ञानी होतो. पुस्तकाचे सानिध्यात राहिल्यास खरा आनंदही मिळतो पुस्तके संस्कार घडवतात पुस्तके माणसाला अंतर्मुख करतात त्यामुळे ग्रंथालयात जाऊन ग्रंथ वाचणे खूप छान गोष्ट आहे. आनंदाचा विषय आहे असे ते म्हणाले. ''ज्याच्या हाती पुस्तक त्याचे शांत राहाते मस्तक.'' या उक्ती प्रमाणे तरुणांकडून वाचनाची आवड निर्माण होईल अशी अपेक्षा व्यक्त करून सानेगुरुजी वाचनालयाचे व ग्रंथपाल सतीश टाकळकर यांचे कौतुक केले. या प्रसंगी प्रा. बाबुराव दहिफळे, विश्वनाथ भायेकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. प्रदीप कदम यानीं केले.तर आभार ग्रंथपाल सतीश टाकळकर यांनी मानले.



# जालन्यातील उच्चभ्रु सोसायटीमध्ये कुंटनखान्यावर छापा; तीन पुरुषांसह एका महिलेस केले पोलिसांनी जेरबंद

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

जालना ते अंबड जाणाऱ्या रोडलगत असलेल्या यशवंतनगर पाटीजवळील उच्चभ्रु सोसायटीमध्ये एका घरात एक महिला कुंटणखाना चालवित असल्याची माहीती प्राप्त झाल्याने त्यांचेवर कारवाई करणे बाबत मा. पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी सुचना दिल्या होत्या.
त्या अनुशंगाने दिनांक ०७/०१/२०२५ रोजी यशवंतनगर पाटीजवळील उच्चभ्रु सोसायटीमध्ये किरायाणे घेतलेल्या एका घरात महिला नामे आशा मनोहर पवार रा. सतकरनगर जालना हि तीच्या स्वतः च्या आर्थिक फायद्यासाठी बाहेरुन स्त्रीयांना आणुन वेश्या व्यवसाय करीत असल्याची माहीती मिळाल्याने सदर ठिकाणी छापा टाकुन त्या ठिकाणी कुंटणखाना चालविणारी महिला नामे आशा मनोहर पवार वय ४० वर्षे, रा. सतकरनगर जालना, तीन पिडीत



महिला, तीन पुरुष असे मिळुन आले असुन त्यांचे ताब्यातुन एकुण ७४०२५/- रु. किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला आहे. त्यानुसार त्यांना ताब्यात घेऊन कुंटनखाना चालविणारी महिला नामे १) आशा मनोहर पवार वय ४० वर्षे, रा. सतकरनगर जालना व तेथे आढळुन आलेले पुरुष आरोपी नामे २) सचिन सुभाष जाधव वय ३४ वर्षे, रा. नुतन वसाहत जालना, ३) बाबुलाल खिमाराम चौधरी वय २५ वर्षे, रा. बालोत्रा ता.जि.बालोत्रा राज्य-राजस्थान ह.मु. शहागंज जि. छत्रपती संभाजीनगर व ४) सचिन अंकुश खोमणे वय २४ वर्षे, रा. चिंचोली मच्छींद्र ता. घनसावंगी, जि.जालना यांचे विरुध्द सहायक पोलीस निरीक्षक श्री योगेश उबाळे यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोलीस स्टेशन तालुका जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन तीन पिडीत महिलांची सुटका करण्यात आली आहे.
सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, प्रशिक्षणार्थी पोलीस अधिक्षक श्री सिध्दार्थ बारवाल, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि श्री. योगेश उबाळे, रामप्रसाद पव्हरे, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, फुलचंद गव्हाणे, कैलास खाडे, सुधिर वाघमारे, इर्शाद पटेल, सतिष श्रीवास, सोपान क्षिरसागर, रमेश काळे, कविता काकस, सत्यभामा काकडे सर्व स्थागुशा जालना यांनी केली आहे.

## संक्षिप्त

### श्रीनिवास तोतलाचे जागतिक पातळीवरील वित्तीय जोखीम व्यवस्थापन परीक्षेत यश

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी



जालना येथील श्रीनिवास नितीन तोतला याने जागतिक स्तरावर आपली प्रतिभा सिद्ध करत, ग्लोबल असोसिएशन ऑफ रिस्क प्रोफेशनल्सतर्फे घेण्यात येणारी वित्तीय जोखीम व्यवस्थापक (ऋख्र्) ही प्रतिष्ठित परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे. अशा प्रकारचे अभूतपूर्व यश मिळवणारा श्रीनिवास जालन्यातील पहिला विद्यार्थी ठरला आहे.

श्रीनिवास हा जालन्यातील नामांकित सीए ड. नितीन तोतला आणि ड. अर्चना तोतला यांचा मुलगा आहे. ग्लोबल असोसिएशन ऑफ रिस्क प्रोफेशनल्सतर्फे घेतली जाणारी एफआरएम (ऋख्र्) परीक्षा ही जागतिक स्तरावर वित्तीय आणि जोखीम व्यवस्थापन क्षेत्रातील सर्वात कठीण आणि प्रतिष्ठित परीक्षांपैकी एक मानली जाते. श्रीनिवासने परीक्षेचा दुसरा टप्पा (भाग २) यशस्वीरित्या पूर्ण केला असून, आता एफआरएम प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेल्या दोन वर्षांच्या व्यावसायिक अनुभवाची पूर्तता करून तो अधिकृत वित्तीय जोखीम व्यवस्थापक (ऋळपरपलळरश्र ठळीज्ञ चरपरसशी) म्हणून मान्यता मिळवणार आहे. या यशामुळे श्रीनिवासला त्याच्या नावासमोर एफआरएम हे मानाचे पदनाम लावण्याचा सन्मान प्राप्त होणार आहे. श्रीनिवासचे हे यश त्याच्या कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि निर्धाराचे फलित आहे. या यशामुळे जालना शहरासह संपूर्ण मराठवाड्याचा नावलौकिक वाढला आहे. श्रीनिवासच्या या जागतिक पातळीवरील कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे. तो वित्तीय जोखीम व्यवस्थापनाच्या क्षेत्रात आपला ठसा उमटवत देशाचे नाव उज्ज्वल करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### जिल्हा परिषद उच्च प्राथमिक उर्दु शाळा पारध बु या शाळेत कॅन्टीन डे साजरा



तभा वृत्तसेवा
पारध/प्रतिनिधी

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक उर्दु शाळा पारध बु या शाळेत कॅन्टीन डे साजरा करण्यात आला. यात विद्यार्थ्यांनी चिकन कंटकी, चिकन राईस, पाणी पुरी, भेळ, कचोरीपासून अगदी रशियन कबाब, आलु वडा, सेंडविच, दूधया खीर, आदी पदार्थ तयार करून आणले होते. स्टॉल लावताना मुलांनी ठेवलेली स्वच्छता पाहून पाहुणेही प्रभावित झाले.
पारध उर्दु शाळेत कॅन्टीन डे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उदघाटन पारध गावाचे सरपंच बाबूराव काकफडे उपसरपंच शेखर भैय्या श्रीवास्तव शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शेख सलीम मोईन उपाध्यक्ष शेख अकील मोहम्मद व महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघटनेचे जिल्हा नेते अजहर पठाण स्टॉलचे उद्घाटन यांच्या हस्ते झाले. विशेष म्हणजे सर्व स्टॉल्सवर साफसफाई होती
पाहून उपस्थित मान्यवरांनी आनंद व्यकत केला. यावेळी विद्यार्थ्यांनी पाणी पुरी, भेळ, कचोरी, समोसे, स्नॅक्स, फ्रूट सलाड कस्टर्ड, डब्बल का मिठा, चिकन बिर्याणी, चिकन कंटकी, रशियन कबाब, साबूदाना वडा, दाबेली, लबदो, चना चाट, भजे, स्टिक फ्रूट, आलु वडा, सैंडविच आदि पदार्थ तयार करून आणले होते. कॉन्टीन डे हा उपक्रम आयोजित करण्यामागे विद्यार्थ्यांनी भविष्यात आपला व्यवसाय कसा करावा, त्यातून कशा प्रकार नफा मिळवता येऊ शकतो. हे उद्दिष्ट समोर ठेवून या 'कॅन्टीन डे'चे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी यांनी १७५००/ व्यवहार झाले, यावेळी पत्रकार बंधू, रवी लोखंडे सर, ठाकूर दादा, समाधान तेलंग्रे, सागर देशमुख, तेजराव दांडगे, शकील अहेमद,व अमोल देशमुख, शिवा लोखंडे, सलीम खान , शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शेख सलीम मोईन उपाध्यक्ष शेख अकील मोहम्मद, शालेय समिती सन्माननीय सदस्य, अजीम भाई, जुबेर भाई, शेख इमरान, मुस्ताक पठाण ,शेख नसीम, शेख शकील, शेख सलीम, याकूब पठाण, असलम पठाण, शेख मोहसीन, सय्यद अकील, गावातले सर्व पत्रकार बंधू आणि पालक व गावकरी आदिची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांचे शाळेचे मुख्याध्यापक जाकीर खान सर यांनी स्वागत केले. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक, मोहम्मद सदाकत सर, सोहेल अहेमद सर, अनिस सर, हिना कौसर मॅडम यांनी परिश्रम घेतले

गोवत्स राधाकृष्णजी महाराज यांच्या श्रीमद् भागवत कथेची जय्यत तयारी

## भोकरदन रोडवरील ब्रजधाममध्ये मंडप भूमिपूजन; पंधरा हजार भाविकांची बैठक व्यवस्था

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी



जालना शहरातील नवा मोंढा रोडवर दानकुंवर परिसरातील श्री ब्रजधाममध्ये १८ ते २४ जानेवारीदरम्यान गोवत्स प. पू. राधाकृष्णजी महाराज यांच्या रसाळ वाणीतून आयोजित श्रीमद् भागवत कथा महोत्सवाचे मंडप भूमिपूजन व ध्वजारोहण बुधवार दि. ८ जानेवारी रोजी प. पू. मनोज महाराज गौड व वे. शा. सं. नागेश महाराज पाथरूडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत यजमान शिवरतन मुंदडा यांच्याहस्ते सपत्नीक करण्यात आले.

श्रीमद् भागवत कथा सेवा समिती व सनातन हिंदू समाज यांच्या संयुक्त विद्यमाने ही कथा आयोजित करण्यात आली आहे. मंडप भूमिपूजनप्रसंगी भागवत कथा सेवा समितीचे पदाधिकारी आणि सदस्य, सर्व यजमान आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी आशीर्वाचनपर बोलताना पू. पू. मनोज महाराज गौड म्हणाले की, गोवत्स राधाकृष्णजी महाराज यांच्या कथेचे आयोजन म्हणजे प्रत्येकासाठी सौभाग्याचा क्षण आहे. श्रीमद्भागवत कथा ही फक्त धार्मिक सोहळा नसून, ती मानवजातीला शाश्वत शांती आणि सद्गुणांचा मार्ग दाखवणारी दिव्य प्रक्रिया आहे. भागवत कथा आपल्याला नित्यधर्म, मानवतेचे महत्त्व, आणि भगवंताशी जोडणारे तत्त्वज्ञान शिकवते. गोपूजन, तुलादान आणि भजनसंध्या यांसारखे कार्यक्रम या कथेच्या माध्यमातून समाजहिताचे दर्शन घडवतील, असे ते म्हणाले. जालना हे भाविक भक्तांचे शहर आहे. प्रत्येक धार्मिक कार्यक्रमात जालनेकर सदैव अग्रभागी असतात. भागवत कथा सनातन धर्माचे मूळ मजबूत करणारा ग्रंथ असल्याचे सांगून आपण सर्वजण एकत्र येऊन धर्म, भक्ती आणि सेवा यांचे महत्त्व अधोरेखित करूया, अशी साद त्यांनी घातली. ब्रजधाम येथे १८ ते २४ जानेवारीदरम्यान दुपारी १ ते ५ या वेळेत श्रीमद् भागवत कथा होणार आहे. याशिवाय दररोज गोपूजन व तुलादान, पहाटे प. पू. राधाकृष्णजी महाराज यांच्या उपस्थितीत संभाजीनगर प्रभागातील श्री बालाजी मंदिर येथून विविध भागात प्रभात फेरी, १९ जानेवारीला रात्री ८ वाजता वृंदावन धामचे पूज्य इंद्रेशजी महाराज यांचा भजन महोत्सव, २२ जानेवारीला रात्री ८ वाजता निकुंज कामरा आणि आरुषी गंभीर यांची भजन संध्या होणार आहे. सहा वर्षानंतर जालना येथे प. पू. राधाकृष्णजी महाराज यांची कथा होत असून, पंधरा हजार भाविक बसू शकतील, अशी बैठक व्यवस्था करण्यात येत आहे. कथेच्या नियोजनासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले आहे. मोठ्या संख्येने भागवत कथा श्रवणाचा लाभ घेऊन आपल्या जीवनाला एक नवीन दिशा द्यावी, असे आवाहन श्रीमद् भागवत कथा सेवा समिती व सनातन हिंदू समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

## कठोरा बाजार येथील दोन ग्रामपंचायत सदस्य अपात्र

तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी

तालुक्यातील कठोरा बाजार ग्रामपंचायतीच्या सदस्य असलेल्या पती-पत्नीनी शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याने या दोघांचेही ग्रामपंचायत सदस्यत्व जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी ६ जानेवारी रोजी दिलेल्या आदेशान्वये रद्द केले असून त्यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. माजी पंचायत समिती सदस्य व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य मुस्ताक खान गफूर खान पठाण व ग्रामपंचायत सदस्या सकीनाबी मुस्ताक खान पठाण या दोघांनी शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याची तक्रार शाहरुख खान मस्तान खान पठाण यांनी जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे केलेली होती.

## चौकशी न झाल्यास आमरण उपोषणाचा दिला इशारा

तभा वृत्तसेवा
जाफ्राबाद/प्रतिनिधी

आरदखेडा येथे सरपंचाच्या बोगस कारभारामुळे आरदखेडा येथील नागरिक त्रस्त रमाई घरकुल योजना असो की, मोदी आवाज योजना असो की पंतप्रधान घरकुल योजना असो वारंवार पत्रव्यवहार करून देखील कोणती प्रकारची चौकशी होत नाही. असा निवेदनाद्वारे गौतम सुरेश साबळे राहणार आरदखेडा यांनी मुख्यकार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.तसेस याबाबत चौकशी तसेच पाणीपुरवठा पाईपलाईन नावाखाली बोगस बिले काढण्यात आली व चौदा व पंधरा वित्त आयोगाची चौकशी करणे बाबत तक्रार दिली होती. परंतु हे सर्व चौकशी झाली नाही म्हणून मी येणाऱ्या १५/ ०१/ २०२५ रोजी पंचायत समिती कार्यालय जाफ्राबाद येथे आमरण उपोषणावर बसणार असल्याचा इशारा निवेदना द्वारे देण्यात आला आहे.

राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव समिती २०२५

## अध्यक्षपदी सर्जेराव बोराडे तर सचिवपदी बबनराव गाडेकर

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी



मराठा सेवा संघ प्रणित राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव समिती २०२५ च्या अध्यक्षपदी सर्जेराव बोराडे तर सचिवपदी बबनराव गाडेकर यांचे निवड करण्यात आली. मराठा सेवा संघ कार्यालय भाग्यनगर,जालना येथील माजी खा. भाऊसाहेब देशमुख सभागृहात जिजाऊ जन्मोत्सव समितीचे माजी अध्यक्ष आर.डी. पवार यांचे अध्यक्षतेखाली व मराठा सेवा संघाचे अध्यक्ष संतोष मिसाळ तसेच राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव समितीचे माजी अध्यक्ष राजेंद्र गोरे, सुभाष कोळकर, महेश नन्नावरे यांच्या प्रमुख उपस्थित बैठक संपन्न झाली.

या बैठकीत खालील प्रमाणे कार्यकारीणी घोषीत करण्यात आली. अध्यक्ष इंजि. सर्जेराव बोराडे, सचिव बबनराव गाडेकर, कार्याध्यक्ष किरण गरड, उपाध्यक्ष विनोद भांडवले, कोषाध्यक्ष प्रा.रमेश गजर, सहसचिव विजय ज-हाड, सहकोषाध्यक्ष दिपक काळे कार्यकारीणी सदस्य ॲड. धनशाश सोळुंके, विष्णु सोनुने ,लक्ष्मण बोंढारे प्रा. गजानन देशमुख, रविंद्र पाटील, रोहीत देशमुख, सिमाताई काकडे गंगाधरे, मंजुश्रीताई झोडगे, सुवर्णा राऊत, संदीप पाटील,सुधाकर पवार, प्रा.बद्रीनाथ घोंगे, ज्ञानेश्वर डुकरे, दौलतराव इंगळे, नंदकुमार कोलते,पंढरीनाथ शेळके, संदिप इंगळे, रघुनाथ खरात प्रसिद्धी प्रमुख विजय मुंडे, कृष्णा तिडके, बद्रीनाथ टेकाळे,अविनाश कव्हळे, सदानंद देशमुख, संतोष भुतेकर यांची निवड करण्यात आली तर मार्गदर्शक म्हणून आर आर खडके संदीपान जाधव, संतोष गाजरे, सुनील आर्दड, विजय पांगारकर,विभावरी ताकट, विमलताई आगलावे, शितलताई तनपुरे, प्राचार्य चंद्रसेन कोठावळे, रोहित देशमुख, राजेंद्र गोरे सुभाष कोळकर,महेश नन्नावरे,आर डी पवार, गुलाब पाटील, काकासाहेब खरात, विजय वाडेकर कैलास खांडेभराड, दत्तात्रय कपाळे, ज्ञानेश्वर ताकट विशेष म्हणजे १२ जानेवारी रोजी सिंदखेडराजा येथे जाणार्या जिजाऊ भक्तांची दिनांक ११ जानेवारी रोजी सायंकाळी जालना येथे सुनील आर्दड यांच्या मातोश्री लान्स व किशोर पांगारकर यांचे मंजुळा देवी मंगल कार्यालय, अंबड रोड, जालना येथे पश्चिम महाराष्ट्रातून येणार्या अंदाजे १००० ते १५०० जिजाऊ भक्तांची सायंकाळी जेवणाची व राहण्याची व्यवस्था करण्यात येत असते. या निवडीबद्दल सर्व पदाधिकार्यांचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात येत आहे

## मुलींनी उच्च शिक्षण घेत स्वतः च्या पायावर उभे राहावे -डॉ.प्रतिभा गोरे



तभा वृत्तसेवा
परतुर/प्रतिनिधी


मुलींसाठी क्रांति ज्योत सावित्रीबाई फुले यांनी शाळा चालु केली त्यांनतर राज्य शासनाच्या वतीने गोरगरिबांच्या मुलींना मोफत शिक्षण मिळावे या साठी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या माध्यमातुन मुलींसाठी शासनाने शिक्षणासाठी दिलेली संधी आहे त्या संधीचे मुलींनी सोने करत ,उच्च शिक्षण घेत स्वतः च्या पायावर उभे राहावे असे प्रतिपादन तहसीलदार डॉ प्रतिभा गोरे , यांनी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या पालक मेळाव्यातून आपल्या मार्गदर्शन पर भाषणातून केले आहे आंबा येथील कस्तुरबा गांधी बालिका निवासी विद्यालयात सोमवारी क्रांति ज्योत सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त माता -पालक मेळावा / किशोरी मेळावा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या माता पालक व किशोरी मेळाव्यात प्रथम क्रांती ज्योत सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे तहसिलदार यांच्या हस्ते पूजन करण्यात आले या पालक मेळाव्यात कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रतिभा गोरे यांची उपस्थितिती होती प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्रीमती आशा मगरे या होत्या तर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गट शिक्षण अधिकारी संतोष साबळे ,गट समन्वयक कल्याण बागल , सरपंच मेहराज खतीब , डॉ. स्मिता रोडगे , श्रीमती आशा शिंदे , केंद्रप्रमुख चांदराव पतिंगराव , राम सोळंके पत्रकार अशोक साखळकर हे उपस्थित होते यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रीमती ज्योती साळवे यांनी केले तर सूत्रसंचालन श्रीमती नयना वायकोस यांनी केले. यावेळी हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी संगीता गोरे ,राजश्री जाधव, शीतल कुलकर्णी , मंगल खवणे , दीपा नारायणकर , रंगारी ब्रह्मा ,शोभा बरीदे , सह महेंद्र लहाने , रामराव अंभूरे, तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले आहेत . या माता पालक व किशोरी मेळाव्याला तालुक्यातील पालकांची लक्षणीय उपस्थिती होती.

आ.बबनराव लोणीकर यांनी निवडणूकी पूर्वी दिलेला शब्द पाळला

## परतुर तालुक्यातील ८००० हजार घरकुलांना उद्दिष्ट प्राप्त; आबबनराव लोणीकर यांच्या प्रयत्नांना यश

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी निवडणुकीपूर्वी परतुर तालुक्यातील सर्वसामान्य गोरगरीब जनतेला दिलेला शब्द पाळला असून प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत ८००० घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून सर्व ग्रामपंचायतीनी प्राधान्य क्रमानुसार गावातील लाभार्थ्यांची रजिस्ट्रेशन येत्या २४ तासाच्या आत करून घ्यावें असे आवाहन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे.



आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रसिद्धी दिलेल्या पत्रकात पुढे म्हटले आहे की, रजिस्ट्रेशन प्रक्रियेनंतर तात्काळ लाभार्थ्यांच्या विहित नमुन्यातील फाईल ग्रामपंचायत मार्फत पंचायत समिती परतूरला सादर कराव्यात असेही या पत्रकात नमूद करण्यात आले आहे.
आमदार बबनराव लोणीकर यांनी निवडणूक काळामध्ये मोठ्या प्रमाणात घरकुले मतदारसंघात खेचून आणणार असल्याचे सांगितले होते या पार्श्वभूमीवर लोणीकर यांनी निवडणूक संपताच घरकुलांसाठी उद्दिष्ट प्राप्त केल्यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये आनंदाचे वातावरण आहेकेंद्र व राज्य सरकार हे . खऱ्या अर्थाने गोरगरिबांसाठी काम करणारे सरकार असून, सर्वसामान्य जनतेच्या हिताचे अनेक निर्णय राज्य व केंद्र सरकारने घेतलेली असून यापुढेही सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू मानून राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून मतदार संघाचा विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी या पत्रकात नमूद केले आहे

# थकबाकी न भरणाऱ्या मालमत्ता धारकावर महापालीकेने केली कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ जानेवारी**

नांवामनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत असलेल्या माऊली कॉम्पलेक्स उस्मानगर रोड लगत असलेल्या मधील १६ गाळे धारकाकडून २८ लाख २६ हजार ९९० रूपये मालमता करापोटी येणे असल्याने व संबंधितांनी टाळाटाळ केल्याने सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांच्या पथकाने ९ जानेवारी रोजी संबंधित गाळे जप्त करून कार्यवाही केली. या कार्यवाहीमुळे थकबाकी मालमत्ता धारकात खळबळ उडाली आहे.



प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कर वसुलीसाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्या आदेशाने व अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त अजितपाल सिंग संधु, सहाय्यक आयुक्त नरसाळे यांच्या नियंत्रणाखाली कर वसुलीसाठी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयास जप्ती व वसुलीसाठी उद्दिष्ट दिलेले आहे. त्यानुसार आज ९ जानेवारी २५ रोजी क्षेत्रिय कार्यालय क्र.६ सिडको याअंतर्गत माऊली कॉम्पलेक्समधील १६ गाळे धारक मालमत्ता धारकांकडे करापोटी रक्कम २८ लाख २६ हजार ९९० एवढी रक्कम येणे बाकी असल्याकारणाने सदरील कराची रक्कम भरण्यासाठी संबंधित मालमत्ता धारकांनी कर भरण्यासाठी असमर्थता दर्शविल्यामुळे संबंधित सदरील कार्यवाही क्षत्रिय अधिकारी डॉ.मिर्झा फरहत उल्ला बेग, कार्यालय अधिक्षक विलास गजभारे यांच्या नियंत्रणाखाली कर निरीक्षक वसंत कल्याणकर, संजय नागापूरकर, वसुली लिपिक मारोती सारंग, मालु एनफळे, रविंद्र पवळे व सतीश महाबळे यांनी केली आहे.

महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्ताधारकांनी आपला चालू व थकीत कराचा भरणा करून करुन महापालिकेस सहकार्य करावे व मालमत्ता जप्ती सारख्या अप्रिय घटना टाळाव्यात असे आवाहन अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांनी केले आहे. तर यापुढेही अशा कार्यवाही सुरुच राहील, असे उपायुक्त स.अजितपालसिंग संधु यांनी सांगितले आहे.

# मच्छीमारीचे कंत्राट भोई समाजालाच मिळण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार: आ. भीमराव केराम

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ०९ जानेवारी**

मागील काळात केलेल्या विकास कामाला प्रभावित होऊन किनवट माहूर मतदारसंघातील प्रत्येक समाज घटकाने मला भरभरून मतदान केले या भागाचा लोकप्रतिनिधी या नात्याने प्रत्येक समाज घटकाच्या विकासासाठी मी कटिबद्ध आहे असे स्पष्ट करत भोई समाजाच्या मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी मंत्रालय स्तरावर पाठपुरावा करेन असे आश्वासन आमदार भीमराव केराम यांनी दिले आहे.महायुतीकडून किनवट विधानसभा मतदारसंघातून दुसऱ्यांदा विजयी झाल्याबद्दल दिनांक ९ जानेवारी रोजी भोई समाज संघटनेच्या वतीने भोईगल्ली येथे आमदार भीमराव केराम यांच्या भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन केले होते त्याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. मंचावर माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, अजय चाडावार सतीश बिराजदार, बालाजी धोत्रे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.



पुढे बोलताना आ. केराम म्हणाले विकासकामात मी कधीही भेदभाव केला नाही. रस्ते,नाल्या, सभागृह पाणीपुरवठा अशा अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कोट्यावधी रुपयाचा निधी खेचून आणला. माझ्या विकास कामाला प्रभावित होऊनच किनवट मतदारसंघातील प्रत्येक समाज घटकांनी मला भरभरून मतदान करून विजयी केले. या भागाचा लोकप्रतिनिधी या नात्याने उपेक्षित समाजघटकाच्या विकासासाठी मी कटिबद्ध आहे.

यावेळी भोईसमाज संघटनेच्या वतीने तालुका अध्यक्ष शुभम कोल्हे उपाध्यक्ष सतीश वाघाडे तालुका सचिव गणेश कोल्हे यांनी आमदार भीमराव केराम यांचा शाल श्रीफळ देऊन व भव्यपुष्पहार घालून यथोचित सत्कार केला. या कार्यक्रमास भोई समाज संघटनेचे सहसचिव दत्ता कोल्हे, विजय बावणे,प्राध्यापक अंबादास जुनघरे,गजानन मोहजे, जनार्धन कोल्हे, आनंद बावणे, शंकर बावणे, राजू शिरपुरे, मारोती बावणे,हरी कोल्हे,राजू कोल्हे,सुंदर कोल्हे, प्रभू कोल्हे, ईश्वर बावणे, पवन बावणे,बालाजी कोल्हे, गणेश कोल्हे, शंकर कोल्हे,अक्षय कोल्हे, लक्ष्मण कोल्हे,दिलीप शिरपुरे, विनीत कोल्हे,दत्ता कोल्हे यांच्या नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### माध्यमिक आश्रम शाळेत ज्ञान उर्जा प्रकल्प साहित्याचे वाटप

**नायगांव**-तालुक्यातील मरवाळी तांडा येथील माध्यमिक आश्रम शाळेतील विमुक्त जाती भटक्या जमाती विद्यार्थ्या सह ईतर विद्यार्थांना ही ईतर मागास बहुजन कल्याण विभाग व नॅशनल मॅनेजमेंट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट मुंबईच्या संयुक्त विद्यमाने ज्ञान उर्जा प्रकल्प साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थांच्या गुणवत्तेत आणि त्यांच्या कौशल्याची वाढ व्हावी.या उद्देशाने ईतर मागास बहुजन कल्याण विभाग नॅशनल मॅनेजमेंट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट मुंबईच्यावतीने प्राचार्य विजयकुमार देशमुख, साईनाथ निटुर यांच्या उपस्थितीत सेवानिवृत्त माजी. प्राचार्य किशनराव रतन राठोड यांच्या हस्ते शाळेतील विमुक्त जाती भटक्या जमातीसह ईतर सर्व मुला मुलींना ज्ञान उर्जा प्रकल्पाचे साहित्य वाटप करण्यात आले. या ज्ञान उर्जा साहित्य वाटपावेळी शाळेतील शिक्षक वृंद सुर्यकांत जाधव,आनंदराव सुर्यवंशी, नागनाथ येल्लूरे, संभाजी मेहेत्रे, देविदास राठोड, गुणवंत कंदूर्के, सुभाष राठोड, पांडुरंग जाधव,सुरेश पवार,महेंद्र सारवले, सुभाष कदम, दिपक बि-हाडे, सचिन राठोड सह,आदि शाळेतील शिक्षक वृंदा सह शिक्षकेतर कर्मचारी शिवाजी नारे, हाणमंत सिंगवाड, बालाजी राठोड, शरद पवार आदी कर्मचारी यावेळी संख्येने उपस्थित होते.

### माजी शिक्षण सभापती शिवराज होटाळकर यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा


**उमरी**-नायगाव विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय नेते तथा माजी शिक्षण व अर्थ सभापती शिवराज पाटील होटाळकर यांच्या वाढदिवसानिमित्त उमरी शहरात विविध उपक्रम राबविण्यात आले, यावेळी ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना फळे वाटप करण्यात आली तर, तर शहरातील सावित्रीबाई फुले मतिमंद विद्यालयात, व मूकबधिर विद्यालय व्यंकटेश नगर उमरी येथे



विद्यार्थ्यांना फळे व खाऊचे वाटप करून शिवराज पाटील होटाळकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. अशोक पाटील शिंदे, गोविंद पाटील जिगळेकर, विलास दादा लोहगावे योगेश पाटील मोरे, अरुण पाटील हंबर्डे, अनसाजी पाटील जिगळेकर, शिवाजी मामा हेमके शिवाभाऊ पांचाळ, माधव पाटील हातणीकर श्रीकांत पाटील धनंजकर युवराज चव्हाण योगेश पाटील ढगे,शुभम पाटील करकाळेकर आदीसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. सदरील कार्यक्रमाचे आयोजन शिवराज पाटील होटाळकर मित्र मंडळाच्या वतीने गोवर्धन पाटील ढगे व राजेश पाटील मोरे यांनी केले.

### तथागत भगवान बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना

**नवीन नांदेड**-पौष पौर्णिमा निमित्त दिनांक १३ जानेवारी रोजी सम्यक बुद्ध विहार दाताळा येते तथागत भगवा बुद्ध यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना पूज्य भदंत पय्याबोधी थेरो आणि भिकू संघ यांच्या हस्ते समाज बांधवांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. यावेळी महाराष्ट्राचे विद्रोही शाहीर कैलास राऊत यांचा प्रबोधनाचा कार्यक्रमाचे ही आयोजन करण्यात आले आहे. दाताळा येथे पौष



तथागत भगवान बुद्ध मूर्तीची दिनांक १३ जानेवारी रोज करण्यात आले आहे. या जानेवारी रोजी सोमवारी धम्म ध्वजाचे ध्वजारोहण होईल तर निळ्या धम्म दाताळा नगरीचे सरपंच पौर्णिमेच्या निमित्ताने प्रतिष्ठापना करण्याचे सोमवारी आयोजित कार्यक्रमानुसार दि. १३ स. १० वा. पंचशील बोधू कसबे यांच्या हस्ते ध्वजाचे ध्वजारोहण प्रदीप शिंदे यांच्या हस्ते करण्याचे आयोजीत करण्यात आले आहे. त्यानंतर लगेचच सकाळी ११ ते १२ वाजता भिकू संघास भोजनदान करण्यात येईल. दुपारच्या सत्रात बारा वाजता तथागत भगवान बुद्ध मूर्तीची मिरवणूक दाताळा नगरीतील मुख्य रस्त्याने काढून मिरवणुकीनंतर लगेच पूज्य भदंत पय्याबोधी थेरो आणि भिकू संघ यांच्या हस्ते मूर्तीची प्रतिष्ठापना होईल. याचवेळी सदरील कार्यक्रमास गावातील सरपंच, उपसरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष, चेअरमन यांच्यासह सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती आपणास लाभणार आहे तरी दाताळा परिसरातील समाज बांधवांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन समस्त भीम जयंती मंडळ दाताळा यांनी केले आहे.

# तुरूंगातील कैद्यांना मिळणार उद्योग उभारणीचे प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ जानेवारी**

कारागृहातून सुटून गेल्यानंतर बंधीवासांना ( तुरूंगातील कैद्यांना ) त्यांच्या स्व:ताच्या स्वबळावर उद्योग स्थापन करुन समाजात स्थान मिळावे, या उद्देशाने जिल्हा उद्योग केंद्रामार्फत नांदेड जिल्हा कारागृहातील ३० बंद्याना उद्योग उभारणीबाबतचे ३० दिवसांचे प्रशिक्षण देण्यात यावे, असे निर्देश प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सुरेखा कोसमकर यांनी दिल्या.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुरेखा कोसमकर यांचे अध्यक्षेतेखाली मा. सर्वोच्च न्यायालय, सुकन्या विरुध्द युनियन ऑफ इंडिया व इतर या प्रकरणात दिलेल्या निर्देशानुसार व मॉडल प्रिझन मॅन्युअल सन २०१६ नुसार नांदेड कारागृहामध्ये नुकतीच बैठक संपन्न झाली. यावेळी त्यांनी कारागृहाची पाहणी करुन बंद्याची विचारपूस केली. तसेच कारागृहात बंद्याना जातीनिहाय काम दिले काय याबाबत त्यांची माहिती घेतली. यावेळी बंद्यानी स्वच्छेने हे काम स्विकारल्याचे तसेच शासनाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे मासिक वेतन मिळते याबाबतची माहिती दिली.

या बैठकीस जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, न्यायाधीश-१ चंद्रशेखर मराठे, जिल्हा विधी सेवा प्राधिकारणाच्या सचिव व न्यायाधीश दलजीत कौर जज, अतिरिक्त पोलीस अधिक्षक

**जिल्हा उद्योग केंद्रामार्फत ३० दिवसांचे प्रशिक्षण**

सुरज गुरव व संबंधित विभागाचे अधिकारी, अशासकीय सदस्य यांची उपस्थिती होती. या बैठकीस सर्वोच्च न्यायालयानी दिलेल्या निर्देशाप्रमाणे कारागृहात बंद्याना देण्यात येणाऱ्या कामाची, स्वच्छता, साफसफाई, कुंडाकाम, स्वयंपाक काम, धान्यगोडाम इ. कामाची समितीपुढे बंद्याना देण्यात आलेल्या कामाची तपासणी केली. यावेळी कारागृहाचे अधिक्षकांनी कारागृहात येणाऱ्या अडी-अडचणी, समस्या व जिल्हा कारागृहात बंद्यासाठी नव्याने शिक्षण व प्रशिक्षण चालू करण्याबाबत जिल्हा विधी सेवा प्राधिकारणाच्या अध्यक्षा व जिल्हाधिकारी यांच्याकडे विनंती केली.

# शेतकऱ्यांच्या मागण्या तात्काळ पूर्ण करा अन्यथा तीव्र आंदोलन करू : कैलास कावळगावकर

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. ०९ जानेवारी**

मागील अतिवृष्टी अनुदान २०२४ चा निधी मंजूर होऊनही कृषी व महसूल यंत्रणेच्या ढिसाळ कारभारामुळे आजतागायत याद्या पूर्ण झाल्या नाहीत. अनेक गावांच्या याद्या या अर्धवट बनविण्यात आल्या. यामुळे अतिवृष्टीग्रस्त शेतकरी अनुदानापासून वंचित राहतील अशी भीती ग्रामीण भागात निर्माण झाली आहे. त्याचबरोबर अनेक तांत्रिक अडचणींमुळे २०२३ चे अतिवृष्टीचे अनुदानही आजतागायत अनेक शेतकऱ्यांना मिळाले नाही. या पार्श्वभूमीवर शेतकरी नेते तथा काँग्रेस पार्टीचे जिल्हा प्रवक्ते कैलास येसगे कावळगावकर यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील शेतकऱ्यांनी तहसीलदार भरत सूर्यवंशी यांना शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन दिले.



अतिवृष्टीच्या अनुदानासोबतच पीएम किसान सन्मान योजनेतील त्रुटी तात्काळ दूर करून वंचित शेतकऱ्यांना न्याय द्यावा, खरीप २०२३ चे पिकविम्याचे पैसे शेतकऱ्यांना तात्काळ अदा करण्याचे विमा कंपनीला आदेश द्यावे अश्या मागण्या यावेळी करण्यात आल्या. शेतकऱ्यांच्या वरील मागण्या तात्काळ पूर्ण करा; अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडू असा धमकीवजा इशारा यावेळी कैलास येसगे कावळगावकर यांनी प्रशासनाला दिला. वरील मागण्या तात्काळ मार्गी लावू असा शब्द यावेळी तहसीलदार भरत सुर्यवंशी यांनी निवेदनकर्त्यांना दिला.


याप्रसंगी कैलास येसगे यांच्यासह गोविंदराव पाटील, शिवकुमार शेटकर, सुभाष कदम, गंगाधर आऊलवार, मारोती पाशमवार, मारोतराव लख्खेकर, गोपाळ मोरे, अँड. महेश देशमुख, अनिल राठोड, विजय पाटील नरंगलकर, महादयाप्पा मठपती, संतोष मिनके, विनोद थडके, संदीप पाटील, कावळगावचे बसवंत पटणे, योगेश बिरादार, शंकर हेडगुळे, सदाशिव झेंगाडे, शेषराव घंटे, संतोष लंजवाडे, राजू देशमुख व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नायगाव शहरातुन ऊस कामगाराचे अपहरण

## पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ जानेवारी**

लातूर जिल्ह्यातील वैशालीनगर निवळी ता. जि. लातूर येथील विलास सहकारी साखर कारखानातील ऊसतोड कामगार व ट्रॅक्टर पुरवठादार वडार समाजातील बालाजी पवार यांचे ऊसतोड ठेकेदारांनी त्यांचे दोन ट्रॅक्टरसह चार दिवसापासून अपहरण केले आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन नायगाव पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करीत कारवाई सुरू केली आहे.



नायगाव तालुक्यातील कांडाळा येथील रहिवासी वडार समाजातील बालाजी बाबा पवार यांच्याकडे दोन ट्रॅक्टर असून ते ऊस तोड कामगार म्हणून देखील मजूर पुरवठा करत असतात. त्यांनी मुखेड तालुक्यातील ऊसतोड ठेकेदार मधुकर दिगंबर बरगे यांच्याकडून दोन ट्रॅक्टर व दहा मंजुर (कोयते) ऊस तोडीसाठी कामास लावले होते. मोबदल्यात बरगे यांनी पवार यांना काही रक्कम देऊ केली होती. परंतु सदर कामात अडथळा आल्यामुळे बंद झाले. त्यामुळे ऊसतोड ठेकेदार बरगे व त्यांच्या सहा साथीदारांनी दि. ०५ जानेवारी २०२५ रोजी नायगाव बसस्थानक समोरून अपहरण केले आहे.

याप्रकरणी अपहर्त्याची पत्नी सारजाबाई बालाजी पवार यांनी नायगाव पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरून बजरंग मधुकर बर्गे, मधुकर दिगंबर बर्गे, गोविंद जयसिंग टेकाळे, अंकुश श्रीराम खनपट्टे, सर्व रा. डोंगरगाव ता. मुखेड व संभाजी आनेराय रा. शेळगाव ता. नायगाव, सुभाष कल्याणकर यांचे विरोधात गु.र नं. ०७/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता १४० (३) ३५१(२), ३५१(३), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पो.कॉ. साईनाथ नागोराव सांगवीकर करीत आहेत.

# शासकीय कामाच्या नावाखाली फुलवळ जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापकाची दांडी



**तभा वृत्तसेवा**
**फुलवळ,दि. ०९ जानेवारी**

होनाजी शेळगावे सरकारी कामांच्या नावाखाली फुलवळ येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बालाजी केंद्रे सतत गैरहजर राहत आहे. केंद्रप्रमुख व वरिष्ठांने याकडे बारकाईने लक्ष घालून विद्यार्थ्यांची होत असलेली हेळसांड थांबवणे गरजेचे आहे.

शिक्षण विभागाच्या विविध कामांच्या नावाखाली फुलवळ येथे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बालाजी केंद्रे शाळेत उपस्थिती न राहता दररोजच फिरतीवर राहत असल्याचे उघड झाले आणि येथील एक शिक्षक रजेवर आहे. मुख्याध्यापक व एक शिक्षकाच्या गैरहजेरीमुळे शाळेमध्ये मर्यादित शिक्षकावर विद्यार्थ्यांना शिकवण्याची वेळ आली आहे. सरकारी कामांच्या नावाखाली विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने, याला जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित होत आहे.

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक ही पहिली ते चौथीपर्यंत आहे.या शाळेमध्ये १५९ विद्यार्थी संख्या असून बरेचसे विद्यार्थी हे गोरगरीब, शेतकरी व शेतमजुरांचे लेकर आहे. शाळेमध्ये एकूण सहा शिक्षकाची पदे आहेत त्यामध्ये एक मुख्याध्यापक आणि पाच सहशिक्षक त्यापैकी मुख्याध्यापक हे शासकीय कामाचे कारण सांगून सतत बाहेरगावी असतात आणि गेल्या दोन दिवसापासून एक शिक्षक रजेवर आहे. त्यामुळे या चार शिक्षकांवर एकूण विद्यार्थ्यांना शिकवण्याची जबाबदारी येऊन पडली आहे. अगोदरच शिक्षकांची कमी असतानाच ही मंडळी सरकारी कामांचे दाखले देऊन विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी उपस्थित राहत नसतील, तर विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम कसा पूर्ण होणार, याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे.विद्यार्थ्यांना शिकवण्याच्या वेळेत शिक्षक जर बाहेर जात असतील तर त्यांना कोणत्या वरिष्ठ अधिकाऱ्याचे अभय आहे का ?असाही प्रश्न पालक वर्गातून चर्चेला जात आहे. शाळेच्या वेळेत शासकीय किंवा इतर कामे करणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षक यांना तातडीने वरिष्ठांनी समज देऊन शाळेत हजर राहण्यास सांगण्यात यावे, अशी मागणी पालक वर्गातून केली जात आहे.

# भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत शरद पाटील पवार, बालाजी पांडागळे यांचा जाहीर प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०९ जानेवारी**

भारतीय जनता पक्षाचे प्रदेश अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या उपस्थितीत माजी आ. अमर राजुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली लोहा तालुका काँग्रेस पक्षाचे शरद पाटील पवार व कंधार तालुका काँग्रेस पक्षाचे बालाजी पांडागळे यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देऊन मुंबई येथील भाजप पक्ष कार्यालयात असंख्य कार्यकर्त्यासह पक्षात जाहिर प्रवेश केला.

लोहा-कंधार तालुक्यात काँग्रेस पक्षाला गळती तर भाजप पक्षाला भरती आल्याचे पक्ष प्रवेशावरुन दिसुन येत आहे.



लोहा-कंधार विधानसभेचे आ.प्रताप चिखलीकर यांनी महायुतीमधील घटक पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडुन निवडणूक लढवून विजय मिळवला आहे. यापुर्वी भाजपमधून नांदेड लोकसभेत विजय मिळवला होता माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण व आ.प्रताप चिखलीकर एकाच पक्षात काम करत असताना विधानसभा निवडणुकी वरुन वेगवेगळ्या पक्षात दाखल झाले . नांदेड जिल्ह्यात पक्षवाढीसाठी रस्सीखेच सुरु झाली आहे. मतदारसंघात भाजप पक्ष वाढीचे काम माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली माजी आ.आमर राजुरकर करत आहेत.जिल्ह्यातील अनेक पदाधिकाऱ्यासह कार्यकर्त्यांनी भाजप पक्षात प्रवेश घेत आहे.

लोहा नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष शरद पाटील पवार यांची आक्रमक भुमिका आ.प्रताप चिखलीकर यांचे कटर विरोधक मानत आसल्याने यापूर्वी भारतीय काँग्रेस पक्षामधील माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी शरद पाटील पवार यांना पाठबळ देऊन स्थानीक पातळीवरची पक्ष वाढीची जबाबदारी दिली होती. त्यांच्या पाठबळाने लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीवर घटक पक्षांची मोट बांधून सत्ता हास्तगत केली आ.प्रताप चिखलीकर यांना ढक्का मानला जात होता पण माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काँग्रेस पक्षाला सोडुन भाजपमध्ये दाखल झाले. काही काळानंतर शरद पवार व बालाजी पांडागळे यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देऊन मुंबई येथील भाजप पक्ष कार्यालयात असंख्य कार्यकर्त्यासह जाहिर प्रवेश केला. यावेळी कृउबाचे संचालक भास्करराव पाटील ढगे, भास्करराव पाटील जोमेगावकर, उद्धव पाटील ढेपे, कृउबा संचालक मधुकर डाकोरे, नागोराव पाटील, कमलाकर शिंदे, सतीश ढाकणिकर, गोविंद पाटील याच्या सह लोहा-कंधार विधानसभा मतदार संघातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रवेश केला.

# शहरात रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या १४ जणांवर कारवाई

## शहर पोलिस आणि वाहतुक शाखा पोलिसांची संयुक्त कारवाई



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ जानेवारी**
शहरातील गांधी चौकातील दुकानांसमोर तसेच रस्त्यावर हातगाडे तसेच दुकानातील साहीत्य ठेवल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. गुरूवार दि ९ जानेवारी रोजी शहर पोलिस आणि वाहतुक शाखा यांच्यावतीने वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या १४ जणांवर कारवाई केली असून त्यांना न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. यापुढेही अशीच कारवाई सुरू राहणार असल्याचे पोनि नरेंद्र पाडळकर यांनी सांगितले आहे.
सध्या मकर संक्रांतीचा सण जवळ आल्यामुळे बाजारात महिला, मुली यांची खरेदीसाठी गर्दी होत आहे तसेच विविध साहीत्य खरेदी करण्यासाठी महिला बाजारपेठेत येत आहेत परंतु येथील गांधी चौक, जवाहररोड, इंदिरा गांधी चौक, महावीर चौक या भागात दुकानांसमोर अस्ताव्यस्तपणे हातगाडे, वाहने उभी केली जात आहेत. तसेच वारंवार सुचना देऊनही फळविक्रेते रस्त्यावर गाडे लावीत आहेत. तसेच काही दुकानदार त्यांच्या दुकानासमोर रस्त्यावर साहीत्य ठेवीत असल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. यामुळे कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता असल्याने पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या आदेशावरून दि ९ जानेवारी रोजी शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर तसेच डीबी पथक, वाहतुक शाखेच्या पथकाने गांधी चौक, महावीर चौक, सदर बाजार, जवाहर रोड या वर्दळीच्या ठिकाणी रस्त्यावर हातगाडे तसेच साहीत्य ठेवणाऱ्याविरोधात कारवाई केली आहे. यावेळी पोनि पाडळकर यांनी रस्त्यावर हातगाडे उभे करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या १४ जणांवर कारवाई करीत त्यांचे हातगाडे पोलिस ठाण्यात जमा केले. तसेच रस्त्यावर ठेवण्यात आलेले साहीत्य जप्त केले आहे. या कारवाईनंतर गांधी चौक, सदर बाजार तसेच महावीर चौक आदी भागातील रस्ते सध्यातरी मोकळे झाल्याचे दिसत आहेत. येथील दुकानदारांनाही हातगाडे चालकांचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. यासंदर्भात त्यांनी पोलिस ठाण्यात तक्रारीही केल्या होत्या.



# सराफा व्यापाऱ्याला लुटणाऱ्या पाचजणांना केले जेरबंद

## हिंगोली स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ जानेवारी**
औंढा नागनाथ तालुक्यातील येडूद ते समगा रस्त्यावर येडूद शिवारात सराफा व्यापाऱ्याला लुटणाऱ्या पाच जणांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले असून त्यांच्याकडून सोन्या चांदीच्या दागिन्यांसह दोन दुचाकी, एक मोबाईल असा ७ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला असून याप्रकरणी पाच जणांना अटक करण्यात आली आहे.
पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली येथील सराफा व्यापारी संतोष सराफ यांचे येडूद येथे सराफा दुकान आहे. दि २५ डिसेंबर २०२४ रोजी संतोष हे त्यांच्या पत्नीसह दुचाकी वाहनावर हिंगोली येथे येत असतांना दुचाकीवर आलेल्या तिघांनी त्यांचे दुचाकी वाहन अडवून संतोष यांना मारहाण केली तसेच त्यांच्या जवळील सोन्या चांदीचे दागिने पळविले होते. याप्रकरणी औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.
या प्रकरणाच्या तपासासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील, पोलिस निरीक्षक कुंदनकुमार वाघमारे यांचय मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे, जमादार गजानन पोकळे, नितीन गोरे, साईनाथ कंठे, आकाश टापरे, नरेंद्र साळवे, हरिभाऊ गुंजकर, आझम प्यारेवाले, दत्तात्रय नागरे, महिला पोलिस कर्मचारी प्रणिता मोरे यांच्या पथकाने आरोपींची माहीती घेण्यास सुरूवात केली. यामध्ये येडूद येथील उमेश घुगे याने सदर गुन्हा केल्याची माहीती मिळताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. पोलिसांच्या अधिक चौकशीमध्ये विठ्ठल इंगोले, रा करंजी जि वाशिम, ज्ञानेश्वर भोयर, अजय भालेराव रा देवठाणा ता हिंगोली, प्रमोद तडसे रा हिंगोली, मंगेश घुगे रा येडूद यांचा देखील समावेश असल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी पाच जणांना अटक केली असून त्यांच्याकडून ५ लाख ४७ हजार रूपयांचे सोन्याचांदीचे दागिने तसेच गुन्ह्यात वापरलेल्या दोन दुचाकी व मोबाईल असा एकूण ७ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांनी अजय भालेराव याचा शोध सुरू केला आहे.

# किरण लोंढे आत्महत्याप्रकरणी दोन शिक्षकांसह तिघे अटक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ जानेवारी**
शहरातील करिअर पॉईंट कोचींग क्लासेस मध्ये शिकवणीस असलेल्या किरण लोंढे आत्महत्या प्रकरणात पोलिसांच्या पथकाने दोन शिक्षकांसह तिघांना अटक केली आहे. मागील दोन महिन्यांपासून आरोपी पोलिसांना हुलकावणी देत होते. बुधवार दि ८ जानेवारी रोजी न्यायालयाने आरोपींना चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.
औंढा नागनाथ तालुक्यातील मेथा येथील बारावीत शिक्षण घेणारा विद्यार्थी किरण गजानन लोंढे हा हिंगोली येथील करिअर पॉईंट कोचींग क्लासेसमध्ये शिकवणी वर्गात होता. त्याठिकाणी असलेल्या शिक्षकांचे गैरप्रकार त्याला माहीती झाले होते. त्यामुळे संबंधित शिक्षकांकडून किरणला मानसिक व शारीरिक त्रास तसेच धमक्या दिल्या जात होत्या. अखेरे शिक्षकांच्या त्रासाला कंटाळून किरणने रेल्वेखाली उडी मारून आत्महत्या केली होती. याप्रकरणी शिक्षक अनिल वानखेडे, सतीश थोरात, ज्ञानेश्वर गिरी यांच्यावर हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.
दरम्यान, आरोपींच्या अटकेसाठी मयत किरणचे आजोबासह वडील तसेच गावकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आरोपींना अटक करून न्याय देण्याच्या मागणीसाठी आमरण उपोषण सुरू केले होते. जोपर्यंत आरोपी अटक होत नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही अशी भूमिका उपोषणकर्त्यांनी घेतली होती.
त्यानंतर पोलीस प्रशासना खडबडून जागे झाले. याप्रकरणात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी भुसारे, पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपींच्या शोधासाठी पथके स्थापन करण्यात आली. मागील दोन महिन्यांपासून आरोपी पोलिसांना हुलकावणी देत होते. दुसरीकडे मयत किरण यांचे कुटुंबिय आरोपींना अटक होत नाही म्हणून अस्वस्थ होते. मयत किरण यांचे कुटुंबिय आणि गावकऱ्यांनी यासंदर्भात पोलिस अधीक्षक, जिल्हाधिकारी यांना निवेदने दिली होती. त्यामुळे या प्रकरणाचा तपास वेगाने सुरू करण्यात आला होता. पोलिसांचे पथकातील पोनि गणपत जाधव, जमादार अशोक धामणे, धनंजय क्षीरसागर, संतोष करे, गणेश लेकुळे, संभाजी लेकुळे यांचय पथकाने आरोपींचा शोध सुरू केला. त्यानंतर दि ८ जानेवारी रोजी पहाटे अनिल वानखेडे व सतीश थोरात यांना मलकापूर ते भुसावळ मार्गावरून अटक केली तर ज्ञानेश्वर गिरी यास पुर्णा येथून ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपींना न्यायालयासमोर हजर केले.



**हिंगोली– येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या मैदानावर महाराष्ट्र ग्रामीण जीननोन्नती योजनेंतर्गत उमेदच्यावतीने महिला बचत गटांनी तयार केलेल्या विविध वस्तू, खाद्यपदार्थ यांचे स्टॉल लावण्यात आले आहे. या स्टॉलला भेट देतांना प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांच्यासह जिल्हा परिषदेतील अधिकारी, कर्मचारी दिसत आहेत. छाया– सुनील पाठक**

# शांती आणि एकात्मतेचा संदेशासाठी नर्मदा परिक्रमा

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ९ जानेवारी**



वसमत तालुक्यातील कोनाथा गावचे रहीवाशी व किर्तन सेवेतून समाज प्रबोधन करणारे युवा किर्तनकार व समाज प्रबोधनकार ह.भ.प.भागवत महाराज बेंडे यांना लहानपणापासूनच सामाजिक ऐक्य, समाजातील वाईट गोष्टींचा व वाईट चालीरिती व परंपरा नष्ट व्हाव्यात यासाठी विद्यार्थी दशेपासुनच वाटत असे. शालेय शिक्षण पुर्ण केल्यानंतर त्यांनी काही तरी समाजाचे प्रबोधन व्हावे व त्यातुन समाजाचे कल्याण व्हावे या उद्देशाने त्यांनी किर्तन सेवेची कला अवगत करुन त्यातुन उत्तम प्रबोधन करता येते या माध्यमातून त्यांनी सतत प्रबोधन सुरू केले व स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, सामाजिक ऐक्य व समाजातील शांतीचा संदेश व मुलींच्या सन्मान या गोष्टी समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत गेल्या पाहीजेत व त्याचा प्रचार व प्रसार व्हावा हा एकमेव उद्देश ठेवून त्यांनी नर्मदा परिक्रमा सुरु केली.
त्यांनी ही नर्मदा परिक्रमा त्यांच्या दोन मित्रा सोबत घेऊन ३६०० कि.मी. पायी प्रवास केला व यात त्यांनी जनजागृती करुन शांती व एकात्मता व मुलींच्या सन्मानासाठी समाजाने पुढाकार घेतला पाहिजे हा संदेश देऊन त्यांनी आगळ्यावेगळ्या पद्धतीने नर्मदा परिक्रमा यात्रा यशस्वी केल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होतांना दिसत आहे. त्यांनी केलेल्या यशस्वी परिक्रमा यात्रा निमित्ताने गांवात त्यांच्या गौरव करण्यात येणार आहे. एक दिवसाचा किर्तन महोत्सव होणार आहे. मुलींचे समाजातील महत्त्व जाणून गावातील मुलींचाही या कार्यक्रमात गौरव होणार आहे. हा कार्यक्रम ९ जानेवारी रोजी कोनाथा या ठिकाणी सकाळी ११ वा होणार आहे व या कार्यक्रमात विशेष किर्तन सेवा ह.भ.प.माणिक महाराज रेंगे यांची होणार आहे.अशा आगळ्या वेगळ्या नर्मदा परिक्रमा कार्यक्रमाची सर्वत्र चर्चा होत आहे.
माझा प्रवास ओमकारेश्वर मध्य प्रदेश या राज्यातून ९/१०/२०२४ रोजी चालू झाला हा प्रवास तब्बल ३६०० किमीचा आहे. हे अंतर काढण्यास किमान ७२ दिवस आम्हाला लागले यातील अनुभव वाटेवर नर्मदा मैयाच्या किनाऱ्यावर असलेले आश्रम राहण्याची सोय खाण्याची सोय पूर्णपणे होते आणि ही नर्मदा मैया अमरकंठक पासून यांचा उगम आणि नियमावर या शेरापाशी यांचं नाभी स्थळ व समुद्र या ठिकाणी यांचे चरण असं मांडल्या जातं हा प्रवास करताना फार आनंद सुख आणि जुनी पारंपारिक राहणी अनुभवायला भेटते जसे की जंगलातून प्रवास करणे आणि मयेचे पाणीही पिऊन हीपरिक्रमा करण्यात येते ही परिक्रमा आपल्या महाराष्ट्रातील गुजरात असेल अनेक राज्यातून भरपूर लोक ही परिक्रमा करतात आणि ह्या परिक्रमेत शांती व एकात्मतेचा संदेश व मुलींच्या सक्षमीकरणासाठी व सन्मानाची जनजागृती या नर्मदा परिक्रमा यात्रेतुन केली, अशी प्रतिक्रीया ह भ प भागवत महाराज बेंडे यांनी दिली.

# नापिकीमुळे शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ९ जानेवारी**
वसमत तालुक्यातील बाभूळगाव येथील शेतकऱ्याने नापिकीमुळे गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली असून याप्रकरणी वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.
पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार वसमत तालुक्यातील बाभूळगाव येथील शेतकरी उध्दव मुंजाजी कदम वय ४० यांना बाभूळगाव शिवारात साडे पाच एकर शेती आहे. घरी आई, वडील, पत्नी व दोन मुले असे कुटुंब आहे.या शेतातील उत्पन्नावर त्यांच्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालतो. यावर्षी शेतात सोयाबीन व इतर पिके घेतली होती. मात्र अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले. सोयाबीनच्या लागवडीचा खर्चही निघाला नाही तर उत्पन्न हाती आलेल्या सोयाबीनला बाजारपेठेत भाव मिळाला नाही.
दरम्यान, शेतकरी उध्दव कदम यांनी शेतीवर स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेचे १.६१ लाख रूपये तसेच विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे सुमारे ५३ हजार रूपयांचे कर्ज घेतले होते. याशिवाय खाजगी फायनान्स देखील घेतले होते. नापिकीमुळे कर्ज कसे फेडावे तसेच कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करावा या चिंतेत ते होते. नापिकी आणि कर्जफेडीची चिंता त्यांना अस्वस्थ करीत होती. यामध्येच त्यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी अभिषेक कदम यांनी वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात दिलेल्या माहीतीवरून बुधवार दि ८ जानेवारी रोजी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सहायक पोलिस निरीक्षक गजानन बोराटे, उपनिरीक्षक इ जी डक पुढील तपास करीत आहेत.

# न्याय, समता, बंधुत्व टिकवून ठेवण्यासाठी लोकशाही बळकट असावी– प्रा निलेश कुहीरे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ जानेवारी**
रंजल्या गांजल्यांची सेवा ही ईश्वर सेवा मानली गेली असली तरी सध्या कर्मकांड करून अंधश्रद्धा पसरविण्याचे काम सध्या होत आहे. धर्माच्या नावाखाली डोके भडकविण्याचे काम केले जात असून याला थारा न देता, प्रत्येकाने विज्ञान वादाकडे वळून शिव-शाहू-फुले, आंबेडकर व साधुसंताचे यांचे विचार आत्मसात करून माणसाचे जीवन सुखमय करण्यासाठी न्याय, स्वातंत्र्य, बंधुत्व हे मूल्य टिकवून लोकशाही बळकट करावी असे मत शिवव्याख्याते व कीर्तनकार प्रा. निलेश कुहिरे यांनी व्यक्त केले.



हिंगोली येथे सन २००० पासून मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड व जिजाऊ ब्रिगेड द्वारा अविरतपणे राष्ट्रमाता राजमाता माँसाहेब जिजाऊ व्याख्यानमाला हिंगोली येथील स्मृतीशेष ॲड. ग्यानबाराव शिरसाट विचारमंच, व स्मृतीशेष माजी खा. शिवाजीराव देशमुख सभागृह रामलीला मैदान नगरपरिषद हिंगोली येथे तीन दिवसीय घेतली जाते. या व्याख्यानमालेत नामवंत, व्याख्यात्यांना पाचारण केल्या जाते. या व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे व संभाजी ब्रिगेडचे प्रदेश अध्यक्ष ॲड. मनोज आखरे होते तर समाज कल्याण अधिकारी राजू एडके हे होते. तर प्रमुख अतिथी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नामदेव कोरडे, दाजीबा पाटील, डॉ. प्रकाश अंभोरे, मारोतराव बुद्रुक आदींची परिस्थिती होती. याप्रसंगी शिवकीर्तनकार प्रा. निलेश कुहिरे पुढे म्हणाले की, माणसाचा कर्म हाच त्यांचा धर्म, धर्म म्हणजे कर्तव्य स्वातंत्र्य हाच मोक्ष, ज्ञान हेच देव असे संत तुकोबारायांनी सांगितले, देवाच्या जवळ भेदभाव नाही, मात्र अलीकडे अंधश्रद्धा पसरवून कर्मकांड करण्याचे षडयंत्र रचल्या जात आहे. सर्वसामान्य रंजल्या गांजल्यांची सेवा करण्यासाठी व अंधश्रद्धेतून मुक्ती मिळविण्याची खरी गरज आहे. अंधश्रद्धेमुळे व कर्मकांडामध्ये अडकून कुठेही प्रगती होत नसून अधोगतीकडे जाण्याचा मार्ग सध्या या देशात होत चालला असून यापासून सावध राहून आजची लोकशाही नीतिमत्तेच्या अधिकारावर असल्याने लोकशाहीत कायदा, सुव्यवस्था न्याय, स्वातंत्र्य, बंधुता टिकविण्याची काळाची गरज असल्याचे व्याख्याते व शिवकीर्तनकार प्रा. निलेश कुहिरे यांनी आपल्या व्याख्यानातून प्रबोधन केले. कर्मकांड करू नका, विज्ञानाकडे वळण्याचे काम सर्वांनी करणे गरजेचे आहे. शिव फुले शाहू आंबेडकर यांचे विचार हे जगाला तारणारे असून त्यांच्याच मार्गाने आपण गेलो तर प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी धर्म मोठा केला आहे. त्याचीच स्वातंत्र्याची प्रतिकृती भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून लोकशाही प्रस्थापित केली आहे. न्याय,स्वातंत्र्य व बोलण्याचा अधिकार सर्वसामान्य जनतेला संविधानाच्या रूपाने दिला असल्याचेही असेही प्रा. निलेश कुहिरे यांनी हिंगोली येथे जिजाऊ व्याख्यानमालेतून आपले विचार व्यक्त केले. संचलन ओम तांबिले व जिजाऊ वंदना सायली काळे यांनी गायिली तर प्रस्ताविक माधव जाधव व व्याख्याताचा परिचय महेश राखुंडे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंडित अवचार यांनी तर आभार शिवराज सरनाईक,विश्वास वानखेडे यांनी मानले. या व्याख्यानमालेच्या यशस्वीतेसाठी ॲड मनोज आखरे, खंडेराव सरनाईक, शिवाजीराव ढोकर पाटील, पंडित अवचार, पंडित शिरसाट, राजकुमार वायचाळ, बाबाराव शृंगारे, संतोष बुद्रुक, हरिभाऊ मुटकुळे, प्रकाश अंभोरे, नवीन सोळंके, वसंत गाडे, रामदास कावरखे, दिनकरराव पिसे पाटील, विश्वास वानखेडे, माधव जाधव, नामदेव सरकटे, शिवराज सरनाईक, दत्ता जगताप, विजय पवार, सुरेश मईंग, परसराम हेंबाडे, सुधाकर मेटकर, महेश राखुंडे, पत्रकार शिवाजीराव मेटकर ,गजानन सावके, माणिक डोखळे, दत्ता सावंत, सुधाकर बल्लाळ, गजानना हाके, बळीराम कल्याणकर, विश्वजीत घोडगे, गजानन जाधव, विष्णू पडोळे, नितीन इंगळे यांच्यासह मराठा सेवा संघ, जिजाऊ आणि संभाजी ब्रिगेडच्या अनेक कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे मदत व सहकार्य केले घेतले. यावेळी मोठ्या संख्येने शिवप्रेमी पुरुष व महिला उपस्थित होते.